# प्रकरण १

# सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसराचा परिचय

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## प्रकरण – 1

## सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसराचा परिचय

सातारा जिल्हा हा महाराष्ट्रातील पराक्रमी जिल्हा आहे. शूरत्व, विरत्व व वैराग्य या तीन परंपरांचा त्रिवेणी संगम अत्यंत प्रभावीपणे या जिल्हयात झालेला दिसतो आणि म्हणूनच छ.शिवाजी महाराजासारखे राष्ट्रपुरूष आणि रामदासाच्या सारखे राष्ट्रसंत यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सातारा जिल्हयाचे स्थान भारताच्या इतिहासात श्रेष्ठ आहे.

आपल्या देशाचे वर्णन कवी गोविंदाग्रजांनी त्यांच्या महाराष्ट्र गीतात माझा देश हा कणखर, राकट व फुलांचा देश आहे असे केलेले आहे.

समाजकारण, राजकारण आणि धर्मकारण या तीनही क्षेत्रात सातारा जिल्हा अग्रभागी आहे. प्राचीन काळापासून अगदी अलीकडे कै.यशवंतराव चव्हाण, कै.आबासाहेब वीर, अभयसिंहराजे भोसले यांच्या काळापर्यंतचा इतिहास हेच दाखवून देतो.

अडीच हजार वर्षाचा उज्ज्वल इतिहास या जिल्हयाला लाभलेला आहे. या जिल्हयाचे क्षेत्रफळ 10492 चौ.किमी.[2] आहे. तसेच या जिल्हयात एकूण अकरा तालुके आहेत व 1,58,000 हेक्टर[3] वनक्षेत्र आहे. येथे ज्वारी, बाजरी, हरभरा, गहू, नाचणी, कापूस, भुईमूग ही मुख्य पिके आहेत. काही ठिकाणी भाताचे पीकही येते. तसेच बागायतीत कांदे, बटाटे, ऊस, रताळे, फळे–भाजीपाला येतो. सातारा जिल्हयात सातारा, कराड, पाटण, जावली, कोरेगांव, खटाव, माण, फलटण, वाई, खंडाळा व महाबळेश्वर असे अकरा तालुके आहेत. या जिल्हयात 124 कि.मी.रेल्वे, 130 कि.मी.राष्ट्रीय महामार्ग, 607 कि.मी.राज्यमार्ग, 1198 कि.मी. जिल्हामार्ग आणि 3209 कि.मी. इतर मार्ग[4] आहेत.

सातारा जिल्हयाला कृष्णा, कोयना, वेण्णा, नीरा, येरळा, तारळी, कुडाळी, उरमोडी, माणगंगा, वांग व मोड या नद्यांच्या पाण्याचे वरदान आहे. कृष्णा नदीला तर हा जिल्हा "आईच" म्हणतो. कृष्णा ही सर्वात महत्वाची व मोठी नदी सह्याद्री पर्वतामध्ये महाबळेश्वरजवळ उगम पावते व वाईपर्यंत पूर्वेकडे तर पुढे दक्षिणेकडे वाहते. कराडजवळ कोयना–कृष्णेचा प्रितीसंगम होतो. वेण्णा व उरमोडी नद्याही कृष्णेला मिळतात. खंडाळा तालुक्याला नीरा नदीच्या पाण्याचे वरदान असूनही खंडाळा तालुका हा दुष्काळीच समजला जातो. अशा सातारा जिल्हयाच्या भौगोलिक पार्श्वभूमीवर खंडाळा तालुका वसलेला आहे. तेथील निसर्ग व लोकजीवन खडतर असूनही खंडाळा तालुक्यातील लोकांच्या हाडीमासी या खडतर जीवनाला तोंड देण्याचे सामर्थ्य आहे.

सातारा जिल्हयातला खंडाळा हा शतकानुशतके कोरडा असलेला तालुका आहे. "पडल्या सरी तर बाजरी भरी" अशी या भागाची स्थिती आहे. निसर्गाचे कोरडेपणावर मात करण्यासाठी अनेक धरणयोजना राबविण्याचे उपक्रम शासनाने हाती घेतलेले आहेत. देवधर, धोम–बलकवडी ही धरणे पूर्ण झाल्यास हा तालुका सर्व दृष्टीने संपन्न होईल. पण दशकावर दशके गेली आता या दशकात तरी रान भिजू दे । शेती माती पिकू दे । चारापाण्याचा प्रश्न सुटू दे। विकास गंगेचे स्वप्न फुलू दे । असे या तालुक्यातील जनतेचे गाऱ्हाणे सतत चालू असते. माझीही स्वतःची बिरदेवाला हीच प्रार्थना आहे. कारण या मातीतच माझा जन्म झालेला आहे.

खंडाळा हा विभाग मुळातच सतत दुष्काळग्रस्त. दुष्काळ या परिसरात पाचवीला पुजलेला. निसर्गाची अवकृपा हा त्या परिसराच्या विकासातील फार मोठा अडथळा आहे. त्यातून या भागाचा विकासाचा वेग खुंटलेला आहे. तो म्हणजे हा तालुका वाई आणि फलटण तालुक्यांशी जोडलेला असल्यामुळे या तालुक्याला म्हणावे असे राजकीय नेतृत्व लाभलेले नाही व शासनानेही म्हणावे असे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे विकासापासून दारिद्र्यग्रस्त जनता दूर आहे. फक्त या तालुक्यातील लोकांना व परिसराला रणरणत्या उन्हाचे चटकेच सोसावे लागतात हे सर्वांच्या लक्षात यावे म्हणून मी हा लघु शोध निबंध लिहून अभ्यासकांच्या लक्षात आणून देत आहे. या तालुक्यातील वास्तव जीवनाचा आविष्कार साहित्यरूपाने प्रगट केल्यास येथील वास्तव जीवन

वाचकांच्या मनाचा वेध घेईल असा मला विश्वास वाटतो. माझा प्रदेश कितीही खडबडीत, कष्टमय यातनाचा असला तरी माझे माझ्या प्रदेशावर व जीवनावर प्रेम आहे.

धनगर समाज हा खरा कष्ट करणारा वर्ग पण फायदा मात्र दुसऱ्याला ! पोटाला काही मिळगत नाही, प्राण्यांना चारापाणी नाही. त्यामुळे सतत भटकंती करणे व आलेल्या संकटाशी सामना देणे एवढेच या समाजाच्या नशिबी असते. मी स्वतः एका अडाणी धनगराचा मुलगा असून एम.ए. ची मराठीतून पदवी घेतली आहे व एम.फिल.साठी लोकसाहित्याच्या माध्यमातून धनगरी जीवनाचे दर्शन घडविण्याचा माझा हा प्रयत्न आहे. अलीकडे उपेक्षीत जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारे दलित साहित्य उदयास येऊन एक वेगळा आकार घेऊ पाहत आहे. एका दृष्टीने धनगरी जीवन साहित्यामध्ये उपेक्षीतच ठरले आहे. ही साहित्यातील धनगरी जीवनदर्शनाची उपेक्षा दूर करण्यासाठी माझ्या अभ्यासाचा अल्पांशाने का होईना उपयोग होईल. भावी काळात या धनगरी जीवनाचे बंध अनुबंध लोकसाहित्यात प्रकट झालेले निदर्शनास आणून दिले जाईल व त्यासाठी माझा हा लघु शोध निबंधाचा अल्पांशाने का होईना उपयोग होईल असे मला वाटते. यापूर्वी नागर जीवन अनुभवलेल्या कवींनी धनगरी गीते लिहिली आहेत. ना.घ.देशपांडे यांचे धनगरी गीत सर्वश्रुत आहेच. तथापि अशा कवितेतून खरे वास्तव चित्रण प्रकट होऊ शकलेले नाही. खानदेशातील ना.धो.महानोर या धनगरी कवीने लिहिलेली धनगरी गीते धनगरी जीवनाचे वास्तव जीवन घडवित असल्याने अधिक प्रत्ययकारी आहेत. उदा. "पळसखेडची गाणी" मधील भालडे, ओव्या इ. तर रानकवी यशवंत तांदळे हे अडाणी असूनही पावलोपावली कविता करायचे. त्यांनी रचलेल्या कविता या उच्च दर्जाच्या होत्या.

रानोमाळ भटकणे, डोंगर कपाऱ्यात राहणे, मिळेल ते खाणे, वेळप्रसंगी उपाशी राहणे अशी अवस्था धनगर समाजाची होते. अशा या धनगर समाजाची सतत उपेक्षाच होत राहिलेली आहे. कोणीही त्याच्याकडे लक्ष देत नाही. महाराष्ट्र राज्याच्या सर्व कानाकोपऱ्यात व डोंगर माथ्यावर, कडेकपारीत राहणारा समाज म्हणजे धनगर समाज होय. या समाजासमोर अनेक आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा अडचणी येतात. त्यामुळे हा समाज वर्षानुवर्षे मागासलेला

सातारा जिल्हयाला कृष्णा, कोयना, वेण्णा, नीरा, येरळा, तारळी, कुडाळी, उरमोडी, माणगंगा, वांग व मोड या नद्यांच्या पाण्याचे वरदान आहे. कृष्णा नदीला तर हा जिल्हा "आईच" म्हणतो. कृष्णा ही सर्वात महत्वाची व मोठी नदी सह्याद्री पर्वतामध्ये महाबळेश्वरजवळ उगम पावते व वाईपर्यंत पूर्वेकडे तर पुढे दक्षिणेकडे वाहते. कराडजवळ कोयना–कृष्णेचा प्रितीसंगम होतो. वेण्णा व उरमोडी नद्याही कृष्णेला मिळतात. खंडाळा तालुक्याला नीरा नदीच्या पाण्याचे वरदान असूनही खंडाळा तालुका हा दुष्काळीच समजला जातो. अशा सातारा जिल्हयाच्या भौगोलिक पार्श्वभूमीवर खंडाळा तालुका वसलेला आहे. तेथील निसर्ग व लोकजीवन खडतर असूनही खंडाळा तालुक्यातील लोकांच्या हाडीमासी या खडतर जीवनाला तोंड देण्याचे सामर्थ्य आहे.

सातारा जिल्हयातला खंडाळा हा शतकानुशतके कोरडा असलेला तालुका आहे. "पडल्या सरी तर बाजरी भरी" अशी या भागाची स्थिती आहे. निसर्गाचे कोरडेपणावर मात करण्यासाठी अनेक धरणयोजना राबविण्याचे उपक्रम शासनाने हाती घेतलेले आहेत. देवघर, धोम–बलकवडी ही धरणे पूर्ण झाल्यास हा तालुका सर्व दृष्टीने संपन्न होईल. पण दशकावर दशके गेली आता या दशकात तरी रान भिजू दे । शेती भाती पिकू दे । चारापाण्याचा प्रश्न सुटू दे। विकास गंगेचे स्वप्न फुलू दे । असे या तालुक्यातील जनतेचे गाऱ्हाणे सतत चालू असते. माझीही स्वतःची बिरदेवाला हीच प्रार्थना आहे. कारण या मातीतच माझा जन्म झालेला आहे.

खंडाळा हा विभाग मुळातच सतत दुष्काळग्रस्त. दुष्काळ या परिसरात पाचवीला पुजलेला. निसर्गाची अवकृपा हा त्या परिसराच्या विकासातील फार मोठा अडथळा आहे. त्यातून या भागाचा विकासाचा वेग खुंटलेला आहे. तो म्हणजे हा तालुका वाई आणि फलटण तालुक्यांशी जोडलेला असल्यामुळे या तालुक्याला म्हणावे असे राजकीय नेतृत्व लाभलेले नाही व शासनानेही म्हणावे असे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे विकासापासून दारिद्रयग्रस्त जनता दूर आहे. फक्त या तालुक्यातील लोकांना व परिसराला रणरणत्या उन्हाचे चटकेच सोसावे लागतात हे सर्वांच्या लक्षात यावे म्हणून मी हा लघु शोध निबंध लिहून अभ्यासकांच्या लक्षात आणून देत आहे. या तालुक्यातील वास्तव जीवनाचा आविष्कार साहित्यरूपाने प्रगट केल्यास येथील वास्तव जीवन

वाचकांच्या मनाचा वेध घेईल असा मला विश्वास वाटतो. माझा प्रदेश कितीही खडबडीत, कष्टमय यातनाचा असला तरी माझे माझ्या प्रदेशावर व जीवनावर प्रेम आहे.

धनगर समाज हा खरा कष्ट करणारा वर्ग पण फायदा मात्र दुसऱ्याला ! पोटाला काही मिळगत नाही, प्राण्यांना चारापाणी नाही. त्यामुळे सतत भटकंती करणे व आलेल्या संकटाशी सामना देणे एवढेच या समाजाच्या नशिबी असते. मी स्वतः एका अडाणी धनगराचा मुलगा असून एम.ए. ची मराठीतून पदवी घेतली आहे व एम.फिल.साठी लोकसाहित्याच्या माध्यमातून धनगरी जीवनाचे दर्शन घडविण्याचा माझा हा प्रयत्न आहे. अलीकडे उपेक्षीत जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारे दलित साहित्य उदयास येऊन एक वेगळा आकार घेऊ पाहत आहे. एका दृष्टीने धनगरी जीवन साहित्यामध्ये उपेक्षीतच ठरले आहे. ही साहित्यातील धनगरी जीवनदर्शनाची उपेक्षा दूर करण्यासाठी माझ्या अभ्यासाचा अल्पांशाने का होईना उपयोग होईल. भावी काळात या धनगरी जीवनाचे बंध अनुबंध लोकसाहित्यात प्रकट झालेले निदर्शनास आणून दिले जाईल व त्यासाठी माझा हा लघु शोध निबंधाचा अल्पांशाने का होईना उपयोग होईल असे मला वाटते. यापूर्वी नागर जीवन अनुभवलेल्या कवींनी धनगरी गीते लिहिली आहेत. ना.घ.देशपांडे यांचे धनगरी गीत सर्वश्रुत आहेच. तथापि अशा कवितेतून खरे वास्तव चित्रण प्रकट होऊ शकलेले नाही. खानदेशातील ना.धो.महानोर या धनगरी कवीने लिहिलेली धनगरी गीते धनगरी जीवनाचे वास्तव जीवन घडवित असल्याने अधिक प्रत्ययकारी आहेत. उदा. "पळसखेडची गाणी" मधील भारूडे, ओव्या इ. तर रानकवी यशवंत तांदळे हे अडाणी असूनही पावलोपावली कविता करायचे. त्यांनी रचलेल्या कविता या उच्च दर्जाच्या होत्या.

रानोमाळ भटकणे, डोंगर कपाऱ्यात राहणे, मिळेल ते खाणे, वेळप्रसंगी उपाशी राहणे अशी अवस्था धनगर समाजाची होते. अशा या धनगर समाजाची सतत उपेक्षाच होत राहिलेली आहे. कोणीही त्याच्याकडे लक्ष देत नाही. महाराष्ट्र राज्याच्या सर्व कानाकोपऱ्यात व डोंगर माथ्यावर, कडेकपारीत राहणारा समाज म्हणजे धनगर समाज होय. या समाजासमोर अनेक आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा अडचणी येतात. त्यामुळे हा समाज वर्षानुवर्षे मागासलेला

आढळून येतो. म्हणून या समाजाची कोणत्याच क्षेत्रात प्रगती झालेली दिसून येत नाही.

आज आपल्या देशात भारतीय स्वातंत्र्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष (1997–98) साजरे होत आहे. पन्नास वर्षाच्या या स्वातंत्र्याच्या वाटचालीत धनगर समाजाची मात्र विकासाची दारे अजून बंदच आहेत. हे बंद दरवाजे केव्हा उघडले जातील तेही सांगता येत नाही. स्त्रीया, दलित, आदिवासी, सर्वजण खडबडून स्वविकासासाठी जागृत झाले आहेत. पण धनगरी समाज अजून मेंढरांचे कळप घेऊन गोटेमाळच तुडवित आहे. त्यांचे जीवनही गोटेमाळासारखे खडबडीत आहे. त्याच्या जीवनाचे नंदनवन व्हावे असे माझ्याप्रमाणे अलिकडच्या धनगर तरूणांना वाटते आहे. विज्ञानाची कास धरून एकविसाव्या शतकाकडे वाटचाल चालू असताना आमचा धनगर समाज हातात काठी, खांद्यावर घोंगडी घेऊन मुकेपणाने मुक्या जनावरांना भरवित बसला आहे. हे अंतरीचे शल्य व्यक्त करण्यासाठी मी हा विषय निवडला आहे.

धनगर समाज हा दरिद्री, अडाणी, अज्ञानी व अन्याय सहन करणारा आहे. तसाच तो प्रामाणिक व कष्टाळू आहे. तो कोणाच्या अद्यात वा मद्यात नसतो.

आपला विकास हा आपल्या हातीअजून या समाजाला माहिती नाही. पोटापाण्यासाठी गावोगाव भटकणे, मिळविणे आणि जीवन जगणे एवढेच या लोकांना माहिती आहे. दलितांना उच्च समाजाने उपेक्षित ठेवले. त्यांच्यावर अन्याय केला. पण धनगर समाजाने स्वतःच स्वतःच्या जीवनाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्याचा विकास होऊ शकलेला नाही. आजचा दलित समाज राखेतून उड्डाण घेणारा "फिनिक्स" झाला आहे. धनगरसमाजाचे "फिनिक्स" पक्षी होणे किती गरजेचे आहे याची येथे कल्पना येते. शासनाने धनगर समाजाला उपलब्ध केलेल्या सवलतीचा फायदा घ्यावा तेवढा या समाजाला घेणे अजून जमलेले नाही. कोठेतरी एखादी धनगरी संघटना उभी राहते. एवढीच हालचाल अलिकडे दिसत आहे. धनगरी समाज आमूलाग्र बदलण्याच्या दृष्टीने हे प्रयत्न अत्यंत अल्प आहेत. तरीसुध्दा मा.आण्णा डांगे यांच्यासारखे राजकीय नेते या समाजाला पुढे आणण्यास तत्परतेने प्रयत्नशील आहेत. त्यांच्यासारखे असंख्य नेते उदयाला आले

तर धनगर समाजाचे भवितव्य उज्ज्वल होईल, सामर्थ्यशाली होईल अशी आशा वाटते. यादृष्टीने लोणंद परिसरातील धनगरी जीवनाचे भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि धार्मिक संबंध पाहणे आवश्यक आहे.

1. **भौगोलिक** :–

खंडाळा तालुका हा पूर्वी "खंडाळा पेटा" म्हणून ओळखला जात होता. 1960 च्या पुनर्रचनेनंतर तो खंडाळा तालुका झाला. पुणे–बेंगलोर महामार्गावरील खंबाटकी घाटाचा पायथा ते नीरा नदी हा या तालुक्याचा दक्षिणोत्तर विस्तार तर भाटघर ते लोणंद हा पूर्व–पश्चिम विस्तार आहे. नेहमीच कमी पडणारा पाऊस व वारंवार दुष्काळ यामुळे सर्वच ओसाड माळरान पसरलेले आहे. तरीसुध्दा या नैसर्गिक प्रतिकुलतेपुढे येथील माणूस पश्चिम सिमेवरील मांढरदेवी तर दक्षिणेला साळपे घाटातील बिरोबा व उत्तरेला जेजुरीचा खंडोबा या दैवतांच्या आशिर्वादाने तो हताश झाला नाही. निसर्गाच्या नकाशात त्याने आपला होकार भरला आहे.

खंडाळा तालुका अनेक डोंगरांनी व्यापलेला तालुका आहे. तालुक्याची पूर्व बाजू सोडली तर अन्य तिन्ही बाजूला डोंगर आहेत. या तालुक्याची एकूण लोकसंख्या 1,01,105 एवढी असून या तालुक्यात एकूण 65 गावे आहेत. यातील 50 च्यावर पूर्ण धनगराची गावे आहेत. खंडाळा तालुक्याचे क्षेत्र 526.05 चौ.कि.मीटर असून एकूण वनक्षेत्र 52611.04 चौ.हेक्टर आहे. पैकी बागायती क्षेत्र 14,777 हेक्टर इतके आहे. या तालुक्यातील गुरे व पशु यांची संख्या 10 लाखाच्यावर आढळते. तालुक्यात प्रमुख तीन शहरे असून सर्वात मोठे शहर म्हणून लोणंदला ओळखले जाते. लोणंदची लोकसंख्या 12211 च्या पुढे आहे. नुकताच सन 1997–98 या वर्षी लोणंदला शासनाने नगरपंचायतीचा मान दिलेला आहे. अशा या लोणंदच्या पूर्वेस सरदेचा ओढा आहे. हा सरदेचा ओढा म्हणजे खंडाळा व फलटण तालुक्याची सीमा आहे. तर पश्चिमेला भैरवनाथाचा डोंगर आहे. उत्तरेला नीरा नदी व वीर धरण आहे. तर दक्षिणेला सालपे घाट आणि खंबाटकी घाट आहे. याशिवाय उत्तरेला वाल्हे जवळच्या डोंगरावर वाल्मिकी ऋषींचे मंदीर आहे. आणि पश्चिमेला भाटघर धरण असून शेजारच्या डोंगरावर प्रसिध्द काळूबाईचे मंदीर आहे.

खंबाटकी घाटाला छ.शिवाजी महाराजांनी नाव दिले आहे हे सर्व परिचित आहे. त्यालाही मोठा इतिहास आहे. याशिवाय पूर्वेच्या बाजूने फलटण, सातारा, पुणे यांना जोडणारे रस्ते आहेत. लोणंदवरून इंदोर ते बेंगलोर नवीन रस्ता सुरू होणार आहे. पश्चिमेला खंडाळयावरून राष्ट्रीय महामार्ग नं.4 (एन.एच.4) जातो. तर पुणे ते सातारा हा रस्ता (एस.एच.61) लोणंदवरून जातो. याच रस्त्यावर खंडोबा व बिरोबा देवाचे मंदिर येते. तसेच पुणे ते सातारा हा रेल्वेमार्ग लोणंदवरून जातो. त्यामुळे सर्वच बाबतीत लोणंद परिसराला महत्व आहे.

खंडाळा तालुक्यात डोंगराळ भाग जास्त असल्याने जमीनीच्या बाबतीत बागायती जमीन कमी व जिरायत जमीन जास्त आढळते. त्यामुळे लोकांना कामधंदा नाही म्हणून प्रत्येकजण बाहेरगांवी जाण्याच्या तयारीत असतो. जी जमीन आहे तिच्यात समाधान मानून, मेहनत करून चांगल्या प्रकारचे उत्पन्न घेतो. ही सर्व जमीन पावसावर अवलंबून असल्याने सतत लोकांचे डोळे आकाशाकडे असतात. हे या भागाचे खास वैशिष्टये आहे.

लोणंदच्या परिसरात जास्त डोंगररांगा आहेत. तशाच त्या प्रसिध्दही आहेत. उदा. वाल्मिक ऋषींचा डोंगर म्हणून वाल्हे गावचा डोंगर ओळखला जातो. तर खेड–वाघोशी डोंगरात अनेक ऋषीमुनींची भुयारे आजही पाहावयास मिळतात. हरेश्वरचा डोंगर हरेश्वराच्या नावाने ओळखला जातो तर खंबाटकी घाटालगत हरळी गावच्या डोंगरात कडजाई देवीचे मंदीर डोंगराच्या भुयारात आहे. तशाचप्रकारे या परिसरात बरीच मंदिरे ही डोंगरावरच असलेली पहावयास मिळतात. जेजुरी गडावरील खंडोबाचे दर्शन घेण्यासाठी प्रत्येकाला किती पायऱ्या चढाव्या लागतात याचे वर्णन गुणाबाई आप्पाजी शेळके ही माझी आजी आपल्या गीतातून स्पष्ट करते,

"नवलाख पायरी गड जेजुरी पडला वेडा
चढुनि गेला शिंद्या वरकाळा तुझा घोडा
नवलाख पायरी गड जेजुरी तळाला
सोन्यायाची खंटी दिली गवंडयाच्या बाळाला ।।"

पूर्वी या परिसरात झाडांचे प्रमाण खूप होते. हा दुर्गम, दऱ्याखोऱ्यांचा भाग असल्याने अनेक प्रकारची झाडे होती. या झाडात अनेक प्रकारचे पशुपक्षी राहत. उदा.हरिण ., काळवीट, वाघ, अस्वले इ. हिंस्त्र प्राणीही या जंगलात, डोंगरात राहत. त्यांच्या नावावरूनच काही गावांना नावे मिळाली आहेत. उदा.वाघोशी – वाघ, अवसली –अस्वले. खंडाळयाजवळ असवली गावाशेजारी डोंगरात अरण्यात : अस्वले राहत. दुर्गम भाग असल्याने तिकडे कोणीही फिरकत नसे. या अस्वले प्राण्यांवरून या गावाला असवली हे नाव पडलेले आहे. म्हणून याच असवली गावी भारतातील एकमेव जांबुवंत देवस्थान पाहावयास मिळते. यावरून या असवली गावचे महत्व लक्षात येते. हे खंडाळा तालुक्यातील नैसर्गिक वनराईचे, पशुपक्षांचे प्रमाण घटलेले दिसते. वास्तविक हे या तालुक्याचे वैभव आहे. हे वैभव येथील समाजाने टिकवून धरण्याची गरज आहे. आज या परिसरातील झाडींचे प्रमाण अगदी तुरळक झालेले दिसून येते. जरी आज हा भाग दगडगोटयांचा, दऱ्याखोऱ्यांचा असला तरी इंग्रजांच्या काळात अनेक लोकांचा तो आडोशाचा भाग होता. क्रांतीसिंह नाना पाटील, किसन वीर अशा अनेक क्रांतीवीर, भूमीगत यांच्या राहण्याचा हा परिसर होता हे दिसून येईल.

खंडाळा तालुक्यातील सर्व गावे अनेक वाडयावस्त्यांनी जोडलेली आहेत. त्यामुळे या परिसरात एकही मोठे शहर नाही. म्हणून हा सर्व भाग ग्रामीण भाग म्हणून ओळखला जातो. या परिसरात मोठयात मोठे गाव म्हणून लोणंद या गावाला ओळखले जाते. तरीही लोणंद ग्रामपंचायतीचा महाराष्ट्रात सर्वच बाबतीत दुसरा क्रमांक लागतो. लोणंद ग्रामपंचायतीची स्थापना 1941 साली झाली. या परिसरातील एकूण लोकसंख्येपैकी धनगरी समाजाचे प्रमाण 70 ते 80% इतके आहे.

महाराष्ट्रात एक महत्वपूर्ण बाजारपेठ म्हणून लोणंदला ओळखले जाते. लोणंदचा कांदा बाजार महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. देशी–विदेशी व्यापारी कांदा खरेदीसाठी लोणंदला येतात. लोणंदला कांदा हा लोणंदच्या पूर्व बाजूच्या गावातून येतो. तो हळवा व गरवा अशा दोन जातीचा

असतो. या कांद्याच्या लहानसहान पिशव्या करून परदेशात पाठविल्या जातात. हा कांदा दिसायला चांगला, लालभडक, गोलाकार असून चवीला गोड, जास्त तिखट नसल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्याला चांगली मागणी आहे. दक्षिण मध्य रेल्वे लोणंदवरून जात असल्याने मोठया बाजारपेठेत या ठिकाणच्या मालाची आवकजावक होते तसेच लोणंदच्या आठवडा बाजाराला गर्दी असल्याने यात्रेचे स्वरूप येते. यात जास्त करून कडधान्य, मेंढयांची लोकर, कापूस, कातडी व गुरे यांचा व्यापार प्रामुख्याने चालतो.

प्रामुख्याने या परिसरात कांदा, ज्वारी, बाजरी, मटकी अशी पिके घेतली जातात. निसर्गाची अवकृपा या भागावर असल्याने पडेल त्या पावसावर शेतकऱ्याला समाधान मानावे लागते. या परिसरातील काही गावामध्ये पावसाळयात पाणी टंचाई असते. तर उन्हाळयात अत्यंत वाईट अवस्था होते. हा सर्व परिसरच सतत दुष्काळग्रस्त आहे असे यशवंतराव चव्हाण, लक्ष्मणराव पाटील[5] अशा अनेक मान्यवर नेत्यांनी म्हटलेले आहे. आणि ते खरेही आहे. वीरचे धरण हे खंडाळा तालुक्यात आहे पण फायदा मात्र फलटण, बारामती तालुक्याला होतो. भाटघर धरणाचे भूमीपूजन झालेली दोन तपे होऊन गेली तरी पाणी नाही. धोम–बलकवडीचे पाणी दोन हजार सालापर्यंत या भागातून जाणार आहे. पण दोन हजाराला एकदोन वर्षे बाकी असतानाही कुठेच काहीही दिसत नाही. फक्त निवडणुका आल्या की पाणी मी देणार असा प्रत्येक नेता म्हणत असतो पण निवडणुका संपल्या की या परिसरातील पाणीही संपतेच असा हा सातारा जिल्हयात एकमेव दुष्काळग्रस्त परिसर म्हणून ओळखला जातो.

शेती हा लोकांचा मुख्य व्यवसाय असला तरी जमीन कमी व पावसावर अवलंबून असल्याने दुय्यम पण प्रथम व्यवसाय म्हणून मेंढपाळ व्यवसाय ओळखला जातो. तोच आता प्रथम व्यवसाय बनल्याचे दिसून येते. हे धनगरी लोक 2/3 महिने गावी असतात. तर बाकीचे 7/8 महिने ते कोकणात, वायदेशला जाऊन सतत मेंढपाळासाठी, पोटासाठी भटकंती करतात.

असा हा सर्व बाजूने डोंगरदऱ्यांचा प्रदेश, सतत दुष्काळग्रस्त म्हणजे वीर, धोम धरणे सीमेवर पण फायदा दुसऱ्या भागाला मिळणारा, साधी व गरीब राहणी असलेल्या धनगरी लोकांचा, खडकाळ–मुरमाड जमीन असणारा संपूर्ण डोंगराळ व दुष्काळग्रस्त असा परिसर ओळखला जातो.

अशी या लोणंद परिसराची भौगोलिक रचना, स्वरूप व वैशिष्ट्ये दिसून येतात.

प्रकरणाच्या सुरूवातीला खंडाळा तालुक्याच्या दिलेल्या नकाशावरून खंडाळा तालुक्याची व लोणंद परिसराची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता येते.

2. <u>ऐतिहासिक</u> :–

पुण्यश्लोक गंगाजल निर्मल मातोश्री अहिल्याबाई होळकर यांनी तीस वर्षे केलेला राज्यकारभार, त्यातून समाजापुढे उभा केलेला आदर्श यामुळे जगामध्ये एक आदर्श राज्यकर्ती म्हणून त्यांचे स्थान अद्वितीय आहे. याशिवाय मल्हारराव होळकर, यशवंतराव होळकर, तुकोजी होळकर या धनगर समाजातील ऐतिहासिक महत्व असलेल्या व्यक्ती होत. त्यामुळे या परिसराला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. स्वराज्य स्थापनेतील होळकर, पुरंदरे, दरेकर, धायगुडे, भितांडे, जाधवराव, बोकील या सर्व महनीय व्यक्ती याच भागातील होत. म्हणून धनगरी समाजाच्या जीवनाचा इतिहास उल्लेखनीय आहे.

खंडाळा तालुक्याचा ऐतिहासिक वारसा थेट बुध्द काळापर्यंत जाऊन पोहचतो. शिरवळ जवळचा "पांडवदरा" ही त्याची साक्ष आहे. शिवपूर्वकाळात निजामशहाने "शिरवळ" हे मध्यवर्ती ठाणे म्हणून निवडले होते. शिवकालीन स्वराज्यातील शिरवळजवळचा "शुभानमंगल" या भुईकोट किल्ल्याचे अवशेष आजही पाहावयास मिळतात. याच भुईकोट व जेजुरी किल्ल्याच्या अवतीभोवती धनगर समाज शेळयामेंढयांचे कळप घेऊन आपली गुजराण करीत असतात आणि या धनगर कुटुंबातील आयाबाया आपल्या घरमालकाच्या व्यवसायाची व त्यांनी पाळलेल्या शेळयामेंढयांची गीते मोठया अभिमानाने जात्यावर, सणावाराला, लग्न समारंभावेळी, मुलाला झोपविताना अभिमानाने गात असतात. कठोर व खडतर जीवनाला पाठ दाखवून पळून जाण्यापेक्षा हसतमुखाने जीवनाला सामोरे

जाण्यातच सार्थकता मानतात. म्हणून मला वाटते की धनगर समाज आजच्या विज्ञान युगातील नैराश्यावर मात करणारा असून तो आशावादी आहे. निराशेने जीवनाला पाठ दाखविणारा हा समाज नाही तर येईल त्या परिस्थितीला तोंड देवून जीवनाला सामोरा जाणारा हा समाज या परिसराचे प्रेरणास्थान आहे. तसेच अनेक ऐतिहासिक प्रेरणास्थाने ही या परिसराला लाभलेली आहेत.

लोणंद परिसरातील असवली गावी दमाजी ढमाळ आणि दत्ताजी ढमाळ या पाटलांचा वाद दादोजी कोंडदेव[6] यांनी बाळ शिवाजीराजे यांचेसमोर सोडविला. शिरवळच्या रामजी विठ्ठल देशपांडे यांच्या वतनाचा तंटा जिजाबाईनी[7] स्वतः लक्ष घालून सोडविला. लोणंद परिसरातील बारा गावे धायगुडे यांची म्हणून ओळखली जातात. ती बारा गावे म्हणजे 1)अंदोरी, 2)बोरी, 3)अहिरे, 4)खेड बु।। , 5)मरीआईची वाडी, 6)मोर्वे, 7)पाडळी, 8)पिपरे बु।।, 9)सुरवडे, 10)वाघोशी, इ. ही बारा गावे पेशवाईत धायगुडे यांना ईनाम देण्यात आली होती. मोंगल सत्तेला केलेल्या प्रतिकारासाठी व दाखविलेल्या पराक्रमामुळे ही गावे इनाम देण्यात आली. अफजलखान विजापुराहून वाईस येत असताना त्याने शिरवळ हे ठाणे जिंकलेले होते. अफलजखानाच्या वधानंतर महाराजांनी हे महत्वाचे ठाणे आपल्या ताब्यात घेतले. धनगर समाजाने छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेच्या कामात केलेली मदत उल्लेखनीय आहे.

संत ज्ञानेश्वरांची पालखी लोणंदवरूनच पुढे पंढरपुरला जाते. याचठिकाणी दरवर्षी आषाढी अमावस्येला दोन दिवस पालखीचा मुक्काम असतो. शेगांवच्या गजानन महाराजांची पालखी या ठिकाणी येते. त्याचप्रकारे तुळजापूरची काठी भागवती एकादशीला लोणंदला येते हे सर्व परीचित आहे.

समर्थ रामदास स्वामींनी या परिसराला भेट देऊन खंडोबाची यात्रा त्यांनी पाहिलेली होती.[9]

खंडेरायाचा जेजुरीगड हा मल्हारराव होळकर यांनी बांधला असावा असा उल्लेख लोकसाहित्यात आलेला आहे.

"पहाड पर जोत खडे मलुलुखान

राव होळकरने किल्ला बनाया"[10]

या लोकगीतात मल्हाररावांसारख्या कर्तुत्ववान धाडसी पराक्रमी युगपुरूषाचा जन्म नीरा नदीच्या काठी झाला. नीरा नदी काठी असलेले "होळ" हे मल्हाररावांचे जन्मगाव, मामाचे गांव. मल्हारराव लहानाचे मोठे झाले ते "होळ" या गावीच. पुढे त्यांनी मामाकडे बकरी राखण्याचे काम केले याला इतिहास साक्ष देतो म्हणून या परिसराला इतिहासात फार महत्व आहे.

अहिल्याबाईंच्या कार्याला इतिहासात तोड नाही. त्यावेळी अहिल्याबाईंनी जेजुरीचा नादुरूस्त झालेला तलाव दुरूस्त केलेला होता. असे अनेक तलाव, तळी, विहिरी, मंदिरे, रस्ते, किल्ले यांची डागडुजी करण्यात त्यांचा हातखंडा होता. खऱ्या अर्थाने सर्व धनगर समाजाला संघटित करण्याचे काम अहिल्याबाईनीच केलेले आहे. सर्व जनतेला मायेचा वरदहस्त त्यांनी दिला हे सर्वश्रुत आहेच. त्यांनी हे सर्व कार्य अतिशय कठिण परिस्थितीतून केले. म्हणून त्यांना धनगर समाज आपल्या मनात महत्वाचे स्थान देतो.

जेजुरी हे लोणंद परिसरातील एक ऐतिहासिक, धार्मिक ठिकाण आहे. लोणंद परिसरातील ऐतिहासिक घटना प्रसंगावर अनेक पौराणिक ऐतिहासिक आख्यायिका व कथा उपलब्ध आहेत. एका कथेत प्रत्यक्ष श्रीकृष्ण खंडोबाचे दर्शन घेण्यासाठी आल्याचा उल्लेख आहे.[11] याच जेजुरी गडावर छत्रपती शिवाजी व शहाजी यांची भेट[12] झालेली होती. जेव्हा शहाजीराजे कर्नाटक स्वारीवर गेले होते तेव्हा तेथे जाऊन त्यांना बारा वर्षे झाली होती. म्हणून आपल्या मुलास भेटावयास ते उत्सुक झालेले होते. ही वार्ता जेव्हा शिवाजी महाराजांना समजली तेव्हा आपणही त्यांना भेटावयास जायचे असे त्यांनी ठरविले व दोघांची खंडोबाच्या साक्षीने जेजुरगडावर भेट झाली.

नाना फडणवीसांनीही आपणाला पुत्ररत्न होत नाही म्हणून जेजुरीच्या खंडेरायाला नवस केला होता. "हे खंडोबाराया, गंगाबाईवर तू कृपा कर आणि तिच्या पोटी पुत्ररत्न दे, तू जर

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

असे केलेस तर तुझ्या मंदिरास मी एक लाख रूपये अर्पण करीन."[13] पुढे जेव्हा नानांना पुत्ररत्न झाले तेव्हा त्यांनी आपली प्रतिज्ञा खरी करून दाखविली.

औरंगजेब जेव्हा जेजुरगडावर हल्ला करण्यांस आला तेव्हा गडाची सर्व दारे बंद करण्यात आली होती तेव्हा बादशहाने गडाला सुरंग लावले तेव्हा त्या तटातून, छिद्रातून अनेक भुंगे बाहेर पडले व ते औरंगजेबाच्या सैन्याला चावू लागले. तेव्हा लोक पळून गेले. औरंगजेबाने कान पकडून खंडोबास एक नवस केला की, "या भुंग्याच्या संकटातून वाचव, सव्वा लाख रूपये किंमतीचा सोन्याचा भुंगा तुला अर्पण करीन."[14] अशी कथा आहे. यावरून जेजुरीचे धार्मिक महत्वही लक्षात येते. पुढे औरंगजेबाने आपले हात रूमालाने बांधून नवस पुरा केला आणि मल्हारीला त्या नावाने न पुकारता "मललुखान" नाव दिले. यामुळे आजही मुस्लीम लोक मल्हारीला "मललुखान" या नावानेच पुकारतात. या सर्व पुराव्यावरून जेजुरीचे ऐतिहासिक महत्व लक्षात येते. अशा प्रकारे लोकगीताचे स्वरूप मौखिक असूनही लौकिक जीवनाला ते गति देते. म्हणून भूतकालीन जीवनसंदर्भ वर्तमानकालीन जीवनाचा दुवा साधत राहते असे मला वाटते.

लोणंद परिसरातील शिरवळ, धावडवाडी या ठिकाणी औरंगजेबाच्या सैन्याचे तळ असत. शिरवळ व धावडवाडी या गावी औरंगजेबाच्या राहुटया असून या ठिकाणहूनच तो अनेक ठिकाणी स्वाऱ्या करण्यास जात. आजही या गावी मुस्लीम लोकांची संख्या जास्त आढळते.

खंडाळया जवळच्या घाटाला खंबाटकी म्हणण्याची प्रथा आहे. त्याकाळात कुळांना बक्षीस म्हणून जमीन दिली जायची. त्या जमिनीवर खंड दिला जाई. त्यावरून त्या गावाला खंड देणारे म्हणून खंडाळा असे नाव पडले तर घाटाजवळ अनेक कुळांना शिवाजी महाराजांनी जमिनी बक्षिस दिल्या होत्या. त्या जमीनीत मटकीचे पीक घेतले जायचे. त्यावरून पुढे खा–मटकी – खांबाटकी झाले आहे असे येथील लोकमत प्रचलीत आहे.

आजच्या काळात धनगर समाजाला थोडी फार प्रतिष्ठा लाभू लागली ती छत्रपती शिवाजी महाराजांमुळे. हिंदवी स्वराज्य निर्मितीच्या काळात धनगर समाजाने महाराजांना मोठे सहाय्य केले

आहे. दऱ्याखोऱ्यात, कडेपठारावरील धनगरवाडे ही महाराजांची शक्तीकेंद्रे होती. मराठेशाहीच्या उत्तरार्धात मल्हारराव होळकर हे सुभेदार बनले व सर्व संस्थानिकात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले.

पुण्यश्लोक मातोश्री अहिल्याबाई होळकर यांच्यामुळे धनगर समाजाला सन्मान प्राप्त झाला हे विसरता येणार नाही. नीरा नदीच्या काठी "होळ" या गावी "अहिल्याबाई होळकरवाडा" आजही आपणाला त्यांच्या कार्यकर्तृत्वाची साक्ष देतो. हे या परीसराचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेणे आवश्यक ठरते.

3. <u>सामाजिक</u> :-

सामाजिक समतेचा महान मंत्र देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव – नायगांव हे याच परिसरातील होय. त्यामुळे या परिसरात एक सामाजिक समतेचा वारसा लाभलेला आहे.

लोणंद परिसरात सामाजिक कार्य करण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून असलेली दिसून येते. इ.स.1510–11 या सालातील घटना आहे. बंगाल राज्यातील एक महान वैष्णव संत गौरांग चैतन्य महाप्रभू जेजूरीला खंडोबाच्या यात्रेनिमित्त भेट दिलेली होती. त्यावेळी त्यांनी याठिकाणी असणाऱ्या मुरूळयांची कहाणी ऐकली. ते ऐकून त्यांना फार वाईट वाटले. त्यांनी त्या मुरूळयांना स्वतः उपदेश करून व्यभिचारी जीवनापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उपदेशाने इंदिरा नावाच्या एका मुरूळीस पश्चाताप होऊन तिने आपला धंदा सोडला व सर्व आपली संपत्ती गरीबांना वाटून टाकली आणि खऱ्या अर्थाने ईश्वरचिंतनात तिने आपले उर्वरीत आयुष्य घालविले[15] अशी आख्यायिका आहे.

प्राचीन परंपराचा जरूर अभिमान असावा परंतु त्यामधील काही अनिष्ठ रूढी व परंपरा असतील तर त्याचा त्याग करावा असेच चित्र आज या परिसरात दिसून येत आहे. परीसरात स्त्री जीवनाला सामाजिक स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी औरंगजेबाने मुरूळयांवर बंदी आणली तो पुरावा

इ.स.1501 सालचा[16] सापडतो. या काळापासून या परीसरात स्त्रीबाबतीत खरे सामाजिक कार्य केलेले दिसून येते.

समाजामध्ये देवदासी, मुरूळी, वेश्या यांची जीवने ही निराधार ठरलेली आहेत. या स्त्रियांच्या व्यवसायामुळे स्त्रीजीवन काळवंडले जाते व समाजाचा नैतिक पाया घसरतो. स्त्रीयांवर अन्याय होऊ शकतो ही गोष्ट औरंगजेबाच्याही लक्षात आली होती. म्हणून औरंगजेब बादशहाने मुरूळयांवर बंदी आणण्याचा प्रयत्न केला होता असे लोकसाहित्यातील[17] उल्लेखावरून समजते. ऐतिहासिक काळातही हा व्यवसाय समाजात रूढ होता व औरंगजेबासारख्या बादशहालाही या व्यवसायातील अनिष्ठता जाणवली होती हे येथे स्पष्ट होते. लोककथेतील हा उल्लेख सामाजिकदृष्टया विलक्षण बोलका आहे.

सातारा जिल्हा क्रांतीकारकांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. ब्रिटीश राजवटीला प्रचंड हादरे देणारे अनेक क्रांतीकारक बलिदानासाठी सिध्द होते. स्वातंत्र्याच्या उषःकालाची वाट पाहत असलेला समाज पेटून उठला आणि अनेक मोठमोठे नेते झुंजत राहिले. अशाच नेत्यांमध्ये कै.आबासाहेब वीर हे एक प्रमुख नेते होते. त्यांचे निस्सीम भक्त म्हणून शंकरराव गाढवे यांना ओळखले जाते. त्यांनी गरीब मुल--मुलींना शिक्षण मिळावे म्हणून खंडाळयाच्या पंचक्रोशीत अनेक शाखा उघडल्या आणि मुलामुलींच्या शिक्षणाची समस्या दूर केली. समाजात एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांनी आपला ठसा उमटविलेला आहे.

लोणंद परिसरात सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असणारे व्यक्तीमत्व म्हणजे मा.आनंदराव शेळके पाटील होत. प्रत्येक वाडया--वस्त्यावर पाण्याची सोय व रस्ते असावेत यासाठी सतत ते धडपडत असतात आणि गरीब लोकांचे प्रश्न सोडवितात. तशाच प्रकारे त्यांना मदत करीत असतात. लोणंद गावी सतत 14 वर्षे सरपंच असताना त्यांनी केलेले सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे.

लोणंद परीसरातील सामाजिक कार्य करणारे तिसरे व्यक्तिमत्व म्हणजे घाटदऱ्याचे आबा इंदलकर होय. त्यांनी अनेक व्यवसाय सुरू केले पण समाजाशी असलेले नाते त्यांनी कधीही तोडलेले नाही. केवळ पैशाच्या पाठीमागे न लागता सामाजिक बांधिलकी स्वीकारली आणि समाजसेवेचे अनेक उपक्रम राबविले. घाटदरे या जन्मभूमीत त्यांनी समाजकार्याचा डोंगर उभा केला. इतरांना समतेची, सहिष्णुतेची शिकवण दिली. आपल्या गावातील सर्व ग्रामस्थांना एकत्र आणून आपआपसातील द्वेष, कटुता, अंधश्रध्दा दूर करून एकता आणि बंधुभाव निर्माण केला. व्यक्तिविकासातून ग्रामविकास साधण्यासाठी पिण्याचे पाणी, जलसंधारण, पतसंस्था, बालवाडी, दवाखाना, विद्युत पुरवठा, रस्ते, दुरध्वनी सेवा इ. प्रकल्प स्वतः मार्गी लावले.

एकता, शांतता, समृध्दी हे ब्रिद त्यांनी मानले. त्यासाठी पंचक्रोशीतील थोरामोठयांचे सहकार्य घेतले. समाजकार्याचा गाडा पुढे नेत असताना त्यांनी अनेकांची हलाखीची परिस्थिती पाहून त्यांच्या मदतीसाठी "गुरूराज उद्योग सेवासमूह" स्थापना करून मुंबईकडे जाणाऱ्या तरूणांचा लोंढा थांबविला व लहानमोठे उद्योग सुरू केले म्हणून दुसऱ्याच्या सुखदु:खात सहभागी होणारे आबा हे एक देवामाणूसच होते. अशी अनेक देवमाणसे या परीसराने लोकांना दिली.

याशिवाय डॉ.वकील, शिक्षक, नेते, समाजसुधारक या भागात आहेत. याबाबतीत डॉ.शिवाजी कुंडलकर यांचे या परीसरातील कार्य फार मोलाचे आहे. वैद्यकिय व्यवसायाबरोबर समाजकार्याची आवड असणारे हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.शिवाजीराव कुंडलकर होय. माईसाहेब पारखे ट्रस्टने आदर्शमाता म्हणून गौरविलेलया श्रीमती चंद्राबाई दिनकर कुंडलकर यांचे ते चिरंजिव होत. त्यांनी आपल्या वैद्यकिय व्यवसायात रक्तदान शिबीरे, मोफत नसबंदी शिबीरे, नाक,कान, घसा मोफत शिबिर, जंतू निर्मुलन शिबिर अशी अनेक वैद्यकिय शिबीरे भरवून त्यांनी आपल्या वैद्यकिय ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांकरता केला. गावात रस्ता, मंदिर अशा सोयी केल्या. अशा या परीसराचा विकास करण्यात डॉक्टरांचा सिंहाचा वाटा आहे हे निश्चित !

लोणंद परीसरात अनेक सरकारी दवाखान्यातून अनेक शिबीरे भरवून मोफत लस टोचणी केली जाते. याशिवाय रोटरी क्लबची स्थापना बादशहा शेंडे यांनी करून सामाजिकतेचे एक पाऊल पुढेच टाकलेले दिसून येते. रोटरी क्लबतर्फे रक्तदान, नेत्रदान, अंधश्रध्दा निर्मुलन असे अनेक सामाजिक कार्याचे कार्यक्रम घेतले जातात. लोणंदचे क्रिडामंडळ गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या पुस्तकांचे वाटप करते. शामसुंदर सिताराम डोईफोडे यांच्या स्मरणार्थ मुलांना वह्या-पुस्तके दिल्या जातात. अशा अनेक क्षेत्रात कार्य करणारी सामाजिक कार्याची आवड असणारी माणसे या परीसराने घडविलेली आहेत.

लोणंद परीसरातील सामाजिक परीस्थितीचा विचार करणे येथे आवश्यक ठरते. सामाजिक जीवनदर्शन हा लोकसाहित्याचा गाभा असतो. लोकजीवन जेव्हा लोकसाहित्यात प्रकट होते, तेव्हा वास्तव जीवनाचे दर्शन घडून मन अंत:र्मुख होते. साहित्याची गोडी वाढते. साहित्य हे केवळ कल्पक नसून त्याला वास्तवाच्या रूपेरी कडा असतात याची जाणीव होते. या जाणीवा धनगरी गीताने टिपलेल्या आहेत म्हणून येथे खंडाळा तालुक्यातील सामाजिक इतिहास लक्षात घेतला आहे.

4. <u>राजकिय</u> :-

सातारा जिल्हयाचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान विशेष उल्लेखनीय आहे. क्रांतीसिंह नाना पाटील, पांडु मास्तर, नागनाथ आण्णा नायकवडी, यशवंतराव चव्हाण आदींनी स्वातंत्र्यचळवळीत उडी घेतलेली होती. हे सर्वश्रुत आहेच. खंडाळा हा सातारा जिल्हयातील क्रांतीवीरांचा एक महत्वाचा भाग होता. छ.शिवाजी महाराजांनी देखील मोगल शत्रूसैन्याला दिलेले तोंड त्यांच्या पराक्रम वृत्तीचे व मुत्सद्दीपणाचे द्योतकच आहे. बैलांच्या शिंगांना पलीते बांधून खंडाळयाच्या डोंगरातून छत्रपतींनी शत्रूला हुलकावणी दिली होती. त्यांनी एका वाटेने बैल सोडले व दुसऱ्या वाटेने ते गेले आणि शत्रुला हुलकावणी दिली.

पुढे देश स्वातंत्र्याच्या चळवळीत क्रांतीवीरांना लपण्याचे खंडाळा हे एकमेव ठिकाण होते. खंडाळयाच्या डोंगराने आपल्या कुशीत साताऱ्यातील भारतीय क्रांतीकारकांना सुरक्षित ठेवले होते.

लोकगीतातील धनगरी गीतातून त्याची वर्णने आली आहेत. आजही खंडाळयात पाहुणी म्हणून आलेली शकुंतला साळुंखे आपल्या गीतात म्हणते,

"बाई माझ्या ग अंगणात
आवाज कसला धडकतो
झेंडा तिरंगी फडकतो
बाई माझा "किसन"वीर साहेबाला
त्या पत्र्यामारून त्याच्या बसशील रे उरावरी ।।1।।
बाई माझ्या ग अंगणात
कोण गातो ग राष्ट्रगीत
बाळा माझा तो किसन वीर
कधी होईल जवाहीर ।।2।।
पाडव्याच्या मुहर्तावरी दुमदुमला आनंद
कांग्रेस सरकार आरूढ झाले बोला ग जयहिंद
सुभाष आमचे कनवाळू भारताचे प्रेमाळू
दृष्ट जगाची होईल त्यांना लिंब लेव की ग ओवाळू ।।3।।
नाना पाटील धाडसी भरले नाना छंदांनी
बाबू गेनू चिरंजिव रत्न हिरेच्या माळेचे
हिंदुस्थानी पुन्हा जन्मुनी रक्त गोठतील गोळयांचे
कॅप्टन लक्ष्मीबाई ग बहिण अरूणादेवी ग
क्षणभंगुर हे शरीर माझे अर्पण त्यांच्या पायी ग ।।4।।

सातारा जिल्हयातील संकलीत लोकसाहित्याचा विचार केला तर या साहित्याने मराठी लोकसाहित्याची कुस समृध्द व सतेज केली आहे हे कबूल करावे लागेल. खंडाळा तालुक्यातील स्त्रियांनी या सर्व क्रांतीवीरांच्या भूमीगत चळवळींना प्रेरणा दिली होती व लोकांमध्ये विचारजागृती

केली होती हेच येथे सिध्द होते. वरील अनेक राजकीय नेत्यांचा हा आवडता परीसर होता पण विकासाच्या बाबतीत दूर राहिलेला हा तालुका आहे. कारण या भागाचे दोन मतदारसंघात विभाजन केलेले आहे. एक म्हणजे वाई मतदारसंघ व दुसरा फलटण मतदारसंघ. यामुळे स्थानिक नेता नाही आणि विकासही नाही. स्थानिक नेतेच थोडयाफार प्रमाणात विकास करताना आढळतात.

लोणंद ग्रामपंचायतीची स्थापना सन 1941 साली झाली. पहिले सरपंच म्हणून विष्णुदास गणपत गांधी झाले. त्यांचा कालावधी 3/3/41 ते 30/4/42 एवढा होता. पुढे धनगराचे पहिले सरपंच होण्याचा मान सोमजी रावजी शेळके (8/7/62 ते 31/6/68) यांनी मिळविला. त्यानंतर अलीकडच्या काळात आनंदराव शेळके पाटील यांनी आपल्या सरपंचपदाच्या कारकिर्दीत लोणंदचा व परीसराचा खऱ्या अर्थाने विकास केला. शेतकऱ्यांचा व सर्वांचा नगरपालिकेच्या करापासून बचाव व्हावा असे त्यांचे मत होते.

खंडाळा पंचायत समितीचे पहिले सभापती म्हणून सोनबा ढमाळ यांना मान मिळाला. त्यानंतर पुढे नितीन भरगुडे पाटील यांचा सभापतीपदाचा काळ विशेष उल्लेखनीय समजला जातो. आताही त्यांना सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षण व अर्थ खात्याचे सभापती म्हणून नेमण्यात आले आहे. त्यांच्यानंतर धनगराचे पहिले सभापती म्हणून स्त्री उमेदवार सुनंदा शिवाजी धायगुडे या सभापती झाल्या व एक धनगर स्त्री सुध्दा या भागाचा, परिसराचा विकास करू शकते हे त्यांनी दाखवून दिले.

पूर्वी या परीसरात गटतट अजिबात नव्हते. परंतु आजच्या काळात गटतट जोरात चालू आहेत. त्यामुळे विकासाला खीळ बसलेली आहे. आजच्या निवडणुका या अटीतटीच्या निवडणुका होतात त्यामुळे संघर्ष होऊन अनेक अडचणी निर्माण होतात. अनेक राज्यकर्त्यांनी वैचारिक संघर्षावर सत्ता टिकविण्याऐवजी जातीपतीच्या राजकारणास खतपाणी घातल्याने विकासास अधोगती येते.

धनगर समाजाला कोणत्याही क्षेत्रात म्हणावेसे स्थान नाही. भविष्यात केव्हा हा समाज संघटित झाला, जागृत झाला तर तो राजकीय सत्तेत आपला हक्क मागितल्याशिवाय राहणार नाही.

सातारा जिल्हयातील भूमीगत चळवळीचे "प्रतिसरकार" हे खास वैशिष्टये म्हणावे लागेल. या प्रतिसरकारने खंडाळा तालुक्यात क्रांतीची बिजे पेरली होती. खंडाळा तालुक्यातील जनता प्रतिसरकारच्या प्रेरणेने भारावून गेली होती. ब्रिटीशांना भारत देश सोडणे भाग पाडणे आणि लोकांच्या हिताचे संरक्षण करणे हा प्रतिसरकार संघटनेचा हेतू होता. या संघटनेला खंडाळा तालुक्याने सक्रिय साथ दिली होती. या तालुक्या जवळचे किसन महादेव वीर हे प्रतिसरकारचे अध्यक्षच होते. खंडाळयाच्या डोंगरात प्रतिसरकारचे कार्यकर्ते भरदिवसा, डोंगरात, रानात लपून राहत. खंडाळा तालुक्यातील लोकांनी, विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, आयाबायांनी या क्रांतीकारकांना गुप्तरीतीने जेवण पुरविणे, निरोप देणे इ. कामे केलेली आहेत.

तात्पर्य राजकीय दृष्टीने खंडाळा तालुक्यातील जनता व पर्यायाने धनगरी समाज देश स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होता हेच येथे स्पष्ट होते म्हणून राजकीय दृष्टया खंडाळा तालुक्याचे महत्व विशद करणे मला महत्वाचे वाटते. राजकीय घडामोंडींचा प्रदिर्घ इतिहास असून देखील तो येथे विस्तृतपणे मांडणे शक्य नाही म्हणून अल्पांशाने खंडाळा तालुक्यातील राजकीय स्थित्यंतराचे दर्शन घडविण्याचा मी प्रयत्न केला आहे.

5. <u>सांस्कृतिक</u> :–

लोकांची जीवन जगण्याची विशिष्ठ पध्दती देशकाल परिस्थितीनुसार वेगळी असते. तिलाच आपण "संस्कृती" म्हणतो. संस्कृतीच्या माध्यमातून आपणास त्या त्या प्रादेशिक भागाचा प्रगतीचा मागोवा घेता येतो. त्यासाठी स्थानिक पातळीवर निर्माण झालेल्या संस्थांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून लोकसंस्कृती व लोकसाहित्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या सामाजिक संस्था असून त्या अनादी काळापासून अस्तित्वात येत असतात. त्यांची पाळेमुळे खोलवर रूजलेली असतात. उदा. कुटुंब संस्था, विवाह संस्था, धर्म संस्था, शिक्षण संस्था, शासन संस्था,

अर्थ संस्था या सर्व सामाजिक संस्थाच आहेत. तथापी लोकसंस्कृतीत या संस्थांना आगळेवेगळे महत्व असते. संस्कृतीला टिकवून ठेवण्यासाठी लोकसाहित्य मदत करत असते.

धनगर समाजाने या परीसरात कलेच्या बाबतीत सांस्कृतिक वारसा जोपासलेला आहे. या भागात मोठया प्रमाणात यात्रेच्या वेळी धनगरी ओव्या सादर केल्या जातात. ही सर्व गीते सादर करण्याचा हेतू लोकशिक्षण व लोकमनोरंजन असा असतो. धनगर समाज मनोरंजनातून लोकशिक्षण देत असतो. उदा.श्रावणबाळाची कथा, चिल्या बाळाची कथा इ. तसेच परमेश्वर प्राप्तीसाठी व मनशांतीसाठी मोठमोठे कार्यक्रम होतात. उदा. जागरण पाटर्या, गोंधळ इ. जागरण पार्टीमध्ये निंबोडी गावातील धनगराची लिलाबाई शेळके या मुरूळीचा ताफा या भागात प्रसिध्द आहे. त्याचप्रमाणे काही लोकशाहीर या भागात आहेत की, ज्यांनी शाहिरी परंपरा जोपासलेली आहे. त्यामध्ये खेड गावचे बबन वाघमारे हे शाहिर होत.

लोणंद परीसरातील प्रत्येक गावात संत ज्ञानेश्वर विठ्ठलाची अनेक पारायणे होतात. त्यावेळी भजन किर्तन होते. किर्तनामध्ये पाडळी गावचे धायगुडे महाराज यांचा सिंहाचा वाटा असतो. सालाबादप्रमाणे प्रत्येक गावात भैरवनाथच्या यात्रा होतात. बैलगाडयाच्या शर्यती होतात. दुसऱ्या दिवशी तमाशा व कुस्त्या होतात. हेतू एवढाच लोकमनोरंजन करणे. कारण वर्षभर काम करून कंटाळा आलेला असतो. मनाचे समाधान व्हावे, एकमेकांच्या गाठी पडाव्यात, विचारांची देवाणघेवाण व्हावी, पाहुणचार व्हावा. हा उद्देश असतो. यामुळे युगमानाप्रमाणे होणारे बदल, आचार, विचार प्रचारात येऊन पारंपारिक अनिष्ठ रूढींना आळा बसतो. मस्कोबाच्या मंदिरावर नवरात्र उत्सवावेळी कोल्हाटी स्त्रियांचा नाच होतो. उद्देश हा की देव जागविणे व मनोरंजन करणे. लोणंद परीसरात गणपती उत्सवावेळी, नवरात्र उत्सवावेळी धनगर लोक आवडीने ओव्या म्हणत असतात. गयन, वादन, नृत्य इ. कलामध्ये हा तालुका मागे नाही. लोकगीताच्या माध्यमातून या दृक व श्राव्य कलांना भरपूर वाव मिळालेला दिसतो.

संत ज्ञानेश्वरांच्या पालखीचा लोणंदला दोन दिवस मुक्काम असतो. त्या दिवशी भजन किर्तन, एकतारी किर्तन सादर केली जातात. तसेच बाबा महाराज सातारकरांच्या सारख्या अभ्यासक अनेक लोकांची संतसाहित्यावर व्याख्याने होतात. त्याचप्रमाणे अनेक धनगर लोकांनी एकत्र येऊन हमाल पंचायतीची स्थापना केली आहे. लोणंदला श्रीकृष्ण जन्माष्टमी (गोपाळकाला) दिवशी दहिहंडी सारखा कार्यक्रम पाहण्यासारखा असतो.

लोणंद परीसरातील एक महत्वपूर्ण सण म्हणून "बोरीचा बार" ओळखला जातो. हा बार म्हणजे शिव्यांचा बार घालणे होय. या खेळात स्त्रिया एकमेकींना हातवारे करून शिव्या देतात. हा बार बोरी व सुखेड या गावामधील ओढयावर भरतो. एका गावातील स्त्री दुसऱ्या गावात पळवून नेली जाते. तिला चोळी–बांगडी केली जाते. ज्या गावातील स्त्री पळवून नेली जाते. त्यागावचे सत्व गेले असे समजले जाते व पळवून आणलेल्या गावचे सामर्थ्य वाढले जाते अशी समजूत आहे. एक आनंदोत्सव म्हणून हा स्त्रीयांचा सण ओळखला जातो. या सणावेळी सासरी गेलेल्या स्त्रिया आवडीने माहेरी येतात व एकमेकींना भेटतात.

लोणंद परिसरातील जात्यावर गायलेल्या ओव्यातून स्त्रिच्या हळूवार मनाची स्पंदने टिपलेली आढळतात. ही गीते ऐकणाऱ्याच्या मनाचा भावनिक ठाव घेतात. लग्नाच्यावेळी, बारशावेळी, डोहाळे, रंगपंचमी, वटसावित्री, संक्रातवेळी या सणाला तर सामुहिक स्वरूप येते. ओव्या गाताना स्त्रीयांचा कंठ आनंदाने फुलून येतो. आणि असे सण रोज असावेत असे तिला मनोमन वाटते कारण या सणाला तिला नवी साडी मिळत असते.

महाराष्ट्रातील धनगर समाज हा अनेक कलागुणांनी युक्त असलेला व समृध्द जीवन जगणारा समाज आहे व एकेकाळी होता. याचे नमुने आपणाला आजही धनगरी गीतातून पाहावयास मिळतात. धनगर समाजाची अशी आगळी–वेगळी नृत्यकला पूर्वीपासून आजपर्यंत अस्तित्वात आहे. गजनृत्य या नावाने 26 जानेवारी या प्रजासत्ताकाच्या निमित्ताने होणाऱ्या दिल्लीच्या राष्ट्रीय कार्यक्रमात ही गजनृत्य साजरी होतात. तसेच खेडयापाडयातील लोक सणावाराला, यात्रेला,

लग्नसमारंभाच्यावेळी गजनृत्य करतात. हे गजनृत्य विशेष प्रेक्षणीय असून ते सर्वांच्या दृष्टीस पडावे असे वाटते. परंतु ते अजून सर्वांपर्यंत पोचण्याचा योग आलेला नाही.

धनगर समाज रानोमाळ शेळया–मेंढया राखीत असताना अनेक प्रकारचे खेळ करायला शिकतात. भिंतीला हाथ न लावता केवळ पायाच्या अंगठयाच्या सहाय्याने 10–15 फूट उंच जाऊन तेथून उलटया उडया मारणे, दांडपट्टा, लाठी–काठी, बोथाटी, लेझीम, भालाफेक इ. प्रकारचे खेळ, उलटया उडया, कोलांटया उडया, लांब उडया, उंच उडया असे उडयांचे प्रकार, उंच झाडाला वरून फेकून देऊन दोरी बांधणे, दोरीच्या गाठीचे विविध प्रकार, त्यापासून बनविलेल्या विविध वस्तू, ढोल, तासे, खेताळ, पावा, झांज यासारखी वाद्य वाजविणे. जकेर, गुगूळ, वीर, जागरण, गोंधळ इ. धार्मिक विधी करणे. देवाच्या पालख्या नाचविणे, रूढ पध्दतीपेक्षा वेगळया पध्दतीने देवाची पूजा, आरत्या करणे, लाखोंच्या संख्येने लोक जमतील अशा यात्रा भरविणे हा समाज करीत असतो. म्हणून लोणंद परिसरात अहिल्याबाई होळकर "सांस्कृतिक कला केंद्र" स्थापन करण्यात आले आहे आणि त्याचा विकासही प्रगतीच्या दिशेने चालू आहे. अनेक गजनृत्ये धनगरी ओव्या, भाकणूक, अहिल्याबाईचा जीवनपट यावर मनोरंजक कार्यक्रम होत असतात.

प्रत्यक्ष जीवनात जे जे घडत असते त्यालाच आपण लोकजीवनरिती म्हणतो हीच लोकसंस्कृती असते व त्यातूनच संस्कृतीची जडणघडण होत असते. लोकसंस्कृतीची केवळ तात्वीक चर्चा वेगळी असते. लोकसंस्कृतीचे स्वरूप हे त्यापेक्षा वेगळे असते व ते महत्वाचे असते. म्हणून ते समजून घेणे आवश्यक आहे. विविध कलाप्रदर्शनातून, नाचगाण्यातून, अभंगगीतातून, ओवी–उखाण्यातून संस्कृतीच आजमाविता येते. कालमानानुसार त्यात काही बदलही घडत असतात. तरीही पूर्व परंपरेने चालत आलेले रितीरिवाज, आचारविचार, पोशाख पूर्णपणे कधीच बदलत नसतात. चालीरिती, रूढी, व्रतवैकल्ये, सणवार साजरे करण्याच्या पध्दती पूर्वापार चालत आलेल्या असतात. व त्याचे आपण पालन करत असतो. या संदर्भात विचार होणे आवश्यक आहे. अन आजपर्यंत या पूर्वापार चालत आलेल्या परंपराचा फारसा विचार केलेला नाही. पण पुढील काळात तो करावा

लागेल. लोकसंस्कृतीच्या आचारामागे वैचारिकतेपेक्षा भावनिकताच अधिक असते. या भावनात्मकतेचेच प्राबल्य अधिक असते. श्रध्दा, प्रेम, आदर, वात्सल्य, परोपकार ही सर्व संस्कृतीची मूल्ये समजली जातात. लोकसाहित्याने आणि पर्यायाने धनगरी गीताने जीवनाची भावनात्मक बाजू प्रभावीपणे मांडली आहे.

खंडाळा तालुक्यातील लोक रूढी चालीरिती, परंपरा यांचे काटेकोर पालन करीत असताना दिसतात. बारा महिन्यातले प्रत्येक सण, उत्सव, समारंभ येथील लोक अतिशय आनंदाने पार पाडतात. या परिसरातील लोकसाहित्यात याचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. धनगरांचा देव खंडोबा त्याच्यावर येथील लोकांची अत्यंत श्रध्दा आहे. येथील लोक खंडोबाला जागृत दैवत समजतात. उदा.

म्हाळाच्या महिन्याची निवडते डाळ,
शिलांगणाचे होते सोने
आली आली रंगपंचमी भोळी
जवा तुमच घोड यील तवाच माझ येन व्हईल

लोकजीवनातून लोकसाहित्याची निर्मिती कशी होते याचा प्रत्यय या ओवीतून येतो. लोकजीवन हाच लोकसाहित्याचा गाभा आहे हेच खरे !

लोकसाहित्याने एका दृष्टीने लोकसंस्कृतीच समृध्द केलेली आहे. धनगरी गीतांचा म्हणजेच लोकसाहित्यातील ओव्यांचा परामर्श घेऊन या लोकसाहित्याने लोकसंस्कृती कशी समृध्द केली आहे हेही विस्ताराने पुढील प्रकरणात पहावयाचे आहे. म्हणून विस्तार भयाने खंडाळा तालुक्यातील सांस्कृतिक जडणघडण थोडक्यात विशद करणे मला आवश्यक वाटते.

6. <u>साहित्यिक</u> :-

धनगर समाजामध्ये अनेक थोर साहित्यिक, कवी होऊन गेले आहेत. ना.धों.महानोर, रानकवी यशवंत तांदळे यांच्या कविता वाचताना ग्रामीण भागातील त्यांनी धनगरी जीवनाचे यथार्थ दर्शन कसे घडविले आहे याचा प्रत्यय येतो.

लोणंद परिसरातही काही लहानमोठे साहित्यिक होऊन गेले आहेत. उमाजी नाईकांचे चरित्र हे चरित्रात्मक पुस्तक व.य.भंडलकर यांनी लिहिले आहे. उमाजी नाईकाचे संपूर्ण चरित्र, जीवनपट, त्याचे कार्य त्यांनी या पुस्तकात चित्रित केले आहे. तर सुभाषचंद्र कोळपे यांनी "केमिस्ट्री" या विषयात डॉक्टर ही पदवी मिळवून या क्षेत्रात पहिला क्रमांक मिळविला तर डॉ.बाळासाहेब कुंडलकरांनी बॉटनी या विषयात वरील पदवी संपादन केलेली आहे. लोणंद परिसरात पहिले साहित्याचे डॉक्टर म्हणून वरील धनगर समाजातील वरील दोघांनी क्रमांक पटकावलेला आहे. याशिवाय लोकशाहीर कवी म्हणून बबन वाघमारे यांचा नावलौकिक आहे. त्यांचे पोवाडे व लावण्या ऐकल्यानंतर मनाला एक वेगळयाच प्रकारचा आनंद मिळतो. त्यांनी रचलेला शिवाजी महाराजांचा पोवाडा जेव्हा ते म्हणून दाखवितात तेव्हा शिवाजी राजांच्या काळातच आपण आहोत असे सर्वांना वाटते.

याशिवाय काही लहानमोठे लोककवी या परिसरात होऊन गेले आहेत. उदा. नामदेवराव धायगुडे, बापू खरात, बापू शेळके इ. अनेक लहानमोठया कवींनी आपआपल्या परीने साजेशी रचना केलेली आहे. कवी बापू खरात जेव्हा चिल्याबाळाची कथा म्हणून दाखवितात तेव्हा प्रत्येक ऐकणाऱ्याच्या डोळयातून आसवे येतात. इतक्या भावपूर्व मनाला भिडणाऱ्या ओव्या, कविता, कथा ते म्हणून दाखवितात. बाबू गेनूवर नामदेवराव धायगुडे यांनी रचलेला पोवाडा भावपूर्ण असल्याने इंग्रजांच्या तत्कालीन वागणुकीची व बाबू गेनूच्या धाडसीपणाची साक्ष देऊन जातो. दारूमुळे माणसाला जगणे असह्य होते. माणूस देशद्रोही बनतो. याविषयी ते आपल्या पोवाडयात म्हणतात

धन्य धन्य बाटली ग बाई,

तोटयाची ग आई,

खरी देश द्रोही,

सर्व जगती रे हिचा झगडा

थोरांना दिला हेने कनी कोंडा

जीर जी जी जी ।।

यावरून दारू किती वाईट आहे. त्यामुळे कोणते तोटे होतात याची प्रचीती येते. असे मानवी जीवनाला, मनाला स्पर्श करणारे अनेक शाहीर या परिसरात होऊन गेले. लोकरंजनाबरोबर समाज सुधारणेचे व लोकजागृतीचे कार्य लोकसाहित्यच करत असते.

कवी अरूण फाळके यांचा नुकताच "सुमनगंधा" हा काव्यसंग्रह प्रकाशीत झाला आहे. त्यांचा हा निसर्गावर, ग्रामीण भागावर आधारीत, बरेच काही सांगून जाणारा असा हा काव्यसंग्रह आहे. तर काही नवोदित साहित्यिकांच्यामध्ये प्रा.विभूते, श्री.सुरेश खराते (मुख्याध्यापक) यांचे कार्य मोलाचे आहे.

धनगरी ओव्या म्हणणारे कवी हे तर या भागात मोठयाच प्रमाणात आढळतात. उदा. धुळा बोरकर, आनंदा ठोंबरे, नाना कारंडे, सतिश कारंडे, बापू खरात इ. अशाप्रकारे हे या परिसरातील साहित्य व साहित्यिक, लहानमोठे कवी आणि त्यांची काव्यक्षेत्रातील झेप ही गरूडझेप आहे असे म्हणावेसे वाटते.

धनगर समाजात हुशार व बुध्दिवान लोक पुष्कळ झाले व आहेत. पण बहुसंख्य लोक शैक्षणिकदृष्टया मागासलेले आहेत. निरक्षरांचे प्रमाण अधिक आहे. निरक्षरांना साक्षर होता यावे व त्यांचे अज्ञान दूर व्हावे त्यांच्यात विचारजागृती घडावी व आपल्या जीवनाचे वाड.मय म्हणजेच धनगरी लोकगीते त्यांना समजावीत व या लोकगीतांचे मूल्य त्यांना कळावे हा माझा लघु शोध निबंधाचा हेतू आहे. लोकसाहित्य हे लोकांच्या जीवनाचे वास्तवदर्शन घडविणारे असते व

लोकसाहित्यातील लोकगीते विशेष्तः धनगरी गीते अधिक प्रत्ययकारी असतात व जीवनाचे वास्तवदर्शन घडविणारे असतात. त्याचे स्वरूप, वैशिष्टये व परिणाम दाखवून देण्याचा माझ्या अभ्यासाचा हेतू आहे.

7. **शैक्षणिक :-**

कोणत्याही सनाजव्यवस्थेमध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व असते. कारण समाजपरिर्वतन हे शिक्षणाने होत असते. म्हणून शिक्षण हा प्रत्येकाचा तिसरा डोळा आहे असे समजले जाते.

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाची सर्व देशाची वाईट अवस्था होती. लोणंद परिसरातही हीच परिस्थिती होती. कारण शिक्षण म्हणजे काय ? शाळा म्हणजे काय ? ते कशासाठी घ्यायचे ? हेच या भागातील लोकांना कळत नव्हते. शिक्षण घेऊन काय करायचे ही लोक्रांची धारणा होती.

महाराष्ट्रातील बहुजन समाजात सुशिक्षीत बेकारांची संख्या दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढत आहे याचे अधिक प्रमाण धनगर समाजात आहे. सुरवातीला कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ आण्णांच्यामुळे एक, दोन, मनापासून शिकू लागले. पण शाळा नाही, शिकायचे कोठे, वेळ नाही, पैसे नाहीत. असे अनेक प्रश्न निर्माण झाले. तरीसुध्दा या भागातील काही जिद्दी व धाडसी लोकांनी शाळांची सोय करण्याचे ठरविले. कर्मवीरांनी या भागाला भेट देऊन लोणंद या ठिकाणी शाळा उघडण्याचे ठरविले आणि लोणंदला रयत शिक्षण संस्थेचे पहिले विद्यालय सुरू झाले. कर्मवीरांच्या लक्षात आले की शैक्षणिक उठावाची कल्पना सोपी वाटली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे सोपे नाही. कारण या सर्व परिसरात डोंगर, पठार, दऱ्या खोऱ्या, वाडया-वस्त्या असल्याने लांबच्या मुलांना शिक्षण घेता येणार नाही हे त्यांनी ओळखून लोणंदला पहिले मालोजीराजे विद्यालय सुरू करण्यात आले.

तशाचप्रकारे सन 1952 साली खंडाळयातील गिरणी कामगारांच्या शैक्षणिक तळमळीतून राजेंद्र विद्यालयाची स्थापना करण्यात आली आणि खंडाळयाच्या खडकाळ भूमीवर खंडाळा विभाग

शिक्षण समितीचा "ज्ञानवृक्ष" अनेक ज्ञानपिपासूंची तृप्ती करीत, शीतल छाया देत कृतार्थतेने आजतागायत उभा आहे. या वृक्षाची जोपासना करण्यासाठी ज्यांनी निष्ठापूर्वक परिश्रम केले त्यातील एक सुसंस्कृत व्यक्तिमत्व म्हणजे मा.शंकररावजी गाढवे होत. ही खंडाळयाची संस्था स्थापन करण्यात कै.आबासाहेब वीर यांचे योगदान फार मोलाचे आहे.

रयत शिक्षण संस्था, खंडाळा विभाग शिक्षण समिती, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, भैरवनाथ शिक्षण संस्था, संत शिक्षण संस्था, ज्ञानसंवर्धीनी व आश्रमशाळा, मांगल्य शिक्षण संस्था इ. अनेक शिक्षण संस्थांमधून अनेक गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी बाहेर पडून राष्ट्रीय स्तरावरील संरक्षण दल आणि विविध प्रशासकिय क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी म्हणून या देशाची प्रामाणिक सेवा करीत आहेत. संख्यात्मकदृष्टया विचार केला तर आज या तालुक्यात दोन वरिष्ठ महाविद्यालये, एक पशुवैद्यकिय महाविद्यालय, एक अध्यापिका विद्यालय, एक औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, चार कनिष्ठ महाविद्यालये, एकोणीस माध्यमिक विद्यालये, ब्याण्णव प्राथमिक शाळा, व बावन्न बालवाडया ज्ञानदानात कार्यरत आहेत. या शैक्षणिक विकासाचा मानबिंदू म्हणजे कै.सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव "नायगाव" हे आमचे तिर्थक्षेत्र आहे. भारतातील आद्य स्त्रीशिक्षिका "सावित्री" खंडाळा तालुक्याची माहेरवाशीण आहे. सावित्रीबाईच्या पुण्य स्मृतीनेच महाराष्ट्राचे माजी शिक्षण संचालक मा.चिपळूणकर साहेबांना या दुष्काळी भागातच खरा "ग्रीन स्पॉट" दिसला. त्यांच्या प्रेरणेने माहेर प्रकल्प, व सावित्रीबाई दत्तक पालक योजना या तालुक्यात जन्माला आल्या आणि पुढे संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यान्वीत झाल्या.

समाजाची उंची शिक्षणावर व शिक्षणाची उंची शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थावर अवलंबून असते. त्यादृष्टीने श्री रामकृष्ण चॅरीटिजची अनुग्रहीत विद्यार्थी योजना हे या तालुक्याचे एक वरदानच म्हणावे लागेल. रोटरी क्लब शिरवळ खंडाळा ही सेवाभावी संस्था शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध प्रकारची पारितोषिके देऊन प्रोत्साहन देते तर खंडाळा तालुका दूध पुरवठा संघ प्रत्येक माध्यमिक शाळेला एस.एस.सी.प्रथम तीन क्रमांकासाठी रू.1000/- चे पारितोषित देतो या सर्वांच्याचप्रेरणेमुळे खंडाळा तालुका शिक्षणामध्ये सातारा जिल्हयात अग्रेसर आहे.

ख्रिस्ती धर्माचे इंग्लिश मेडीयम स्कूल, उर्दु लोकांचे धावडवाडी गावी "दारूल इलम धावडवाडी" उर्दुशाळा आहे. या शाळेत महाराष्ट्रातील सर्व मुस्लिम समाजातील विद्यार्थी येतात. त्यांना या ठिकाणी मोफत जेवण, शिक्षण, राहणे या सर्व सोयीनियुक्त अशी एकमेव उर्दुशाळा या परिसरात आहे. लोणंद जवळ ख्रिश्चनांच्या "इंग्लिश मेडीयम स्कूल" मध्ये कोणत्याही समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. धनगर समाजातील 20/25 विद्यार्थी या शाळेत आज शिकतात. या संख्येत पुढे वाढही होईल. तेव्हा धनगर समाज पूर्ण जागृत झाला असेल.

लोणंद परिसरात फक्त मुलांच्या साठीच शाळा नाहीत. मुलींच्या शिक्षणाची सोयही मोठया प्रमाणात आहे. लोणंदमध्ये मुलींच्यासाठी वेगळी कन्याशाळा आहे. या शाळेत धनगर समाजातील मुलीही खूप शिकलेल्या आहेत. 1995 साली इयत्ता 12 वी मध्ये धनगर समाजातील कु.कविता मल्हारी कोळेकर हिने प्रथम क्रमांक मिळविलेला होता तर 1997 मध्ये 12 वीच्या परीक्षेत कोल्हापूर बोर्डात सायन्स विभागात मागासवर्गीयात दुसरा तर बोर्डात बारावा आलेला संतोष लक्ष्मण शेळके हा धनगर समाजातीलच होय.

आज या परिसरामध्ये "कमवा व शिका" या योजनेतून मुलांना शिक्षण मिळू लागले. शिक्षणप्रेमी लोकांचे प्रमाण वाढले. जनतेचा शाळेशी संबंध वाढला. लोकांना शिक्षणाचे महत्व समजत आहे. वाडयावस्त्यावर, डोंगरावर अनेक शाळा, विद्यालये निघाली. मुलांच्या शिक्षणाची सोय झाली.

स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवलेल्या म.फुले यांच्या पत्नी सौभाग्यवती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यासारख्या शहरात मुलींची पहिली शाळा 1948 मध्ये काढून जो क्रांतीकारक इतिहास केला त्याला जगाच्या शैक्षणिक इतिहासात तोड नाही. सावित्रीबाई फुले या दृष्टीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ठरल्या. त्यांचा जन्म खंडाळा तालुक्यात झाला याचा मला सार्थ अभिमान आहे. त्यांनीही अनेक ओव्या लिहून मराठी सारस्वताच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे व लोकसाहित्याला समृध्द केले आहे.

मुलींच्या उच्च शिक्षणासाठी या परिसरात नायगावला सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालयाची स्थापना झाली. अनेक मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सुटला. लोणंदला गरीब विद्यार्थ्यांना राहण्यासाठी विद्यार्थी वसतीगृह बांधण्यात आले. प्राथमिक शाळेत मुलामुलींना स्वतंत्र शिकण्याची सोय करण्यात आली. या भागातील लोणंदचे आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज मा.शरद पवार यांनी दत्तकच घेतले आहे. जून 1986 ला या कॅालेजची स्थापना झाली. या कॉलेजमुळे उच्च शिक्षणाची मुलामुलींची सोय चांगल्याप्रकारे झाली आहे. याशिवाय पंचायत समितीद्वारे अनेक सरकारमान्य वर्ग घेतले जातात. उदा. शिवणकाम, कॉम्प्युटर कोर्स, वायरमन, बालवाडी कोर्स, फिटींग इ. एकंदरीत खंडाळा तालुक्याच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर या परिसरातील विद्यार्थी उभा आहे.

खंडाळा भागातील शिक्षणाची परंपरा जोपासण्याचे व सतत सहकार्य करण्यासाठी मा.आनंदराव शेळके पाटील आणि मा.शंकरराव गाढवे (सर) हे अहोरात्र परीश्रम घेत आहेत आणि शिक्षण हे परीवर्तनाचे प्रभावी साधन आहे हे या परिसरात दाखवून देत आहेत.

निसर्गतः दुष्काळाने ग्रासलेल्या "खंडाळा" तालुक्यात शैक्षणिक दुष्काळ पाहण्याची वेळ येऊ नये म्हणून निसर्गानेच पोटार्थी बनविलेल्या गरीब शेतकऱ्यांची, सामान्य नागरिकांची व मुंबईच्या गिरणी कामगारांची मदत घेऊन शैक्षणिक संस्थेची स्थापना केली आहे. हे काम वाटते तितके सोपे नाही.

आज या शिक्षणाचा सुकाळ असलेल्या परिसरात धनगर समाज शिक्षणाने स्थायिक होत आहे हा एक शिक्षणाच्या परिवर्तनाचाच एक भाग म्हटला पाहिजे. धनगरी समाजास या शिक्षणाच्या कारणाने त्याची इतरत्र होणारी भटकंती थांबेल आणि त्याचे अडाणी, अज्ञानीपण नाहिसे होईल यात शंका नाही. अशाप्रकारे शैक्षणिक ज्ञानशाखामधून खंडाळा तालुक्यातील विद्यार्थी वर्ग आपली ज्ञानाची भूक भागवित आहे असे दिसते. प्रथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय झाल्यामुळे विद्यार्थी वर्ग शिक्षणार्थी होऊ पहात आहे.तरीसुध्दा उच्च शिक्षण घेण्यासाठी उत्सुक असलेला विद्यार्थीवर्ग संख्येच्या दृष्टीने नगण्यच आहे.

सातारच्या रयत शिक्षण संस्थेने स्वावलंबी शिक्षणाची योजना 1919 सालापासून चालू करून खंडाळा तालुक्याला शैक्षणिक दृष्टीने गती देण्याचा प्रयत्न केला आहे. यात शंका नाही. महाराष्ट्राच्या बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. ज्ञान–विज्ञानाबरोबर सुसंस्कारासाठी शिक्षण असले पाहिजे असा ध्येयवाद या संस्थेने सर्वत्र प्रस्तुत केला आहे. शिक्षणाला श्रमाची जोड देऊन कर्मवीर आण्णांनी खंडाळा तालुक्याच्या भूमीत अनेक लोकनेते व कार्यकर्त्यांचे व शैक्षणिक संस्थांचे मोहोळ निर्माण केले आहे यात तिळमात्र शंका नाही.

8. **औद्योगिक** :–

लोणंदचा परिसर खऱ्या अर्थाने औद्योगिकिकरणाच्या अभावी आजही मागासलेला आढळून येईल. याला अनेक कारणे आहेत. त्यापैकी महत्वाचे कारण म्हणजे पाण्याचा अभाव होय. तरीसुध्दा काही उद्योग प्रसिध्दीपथावरही आहेत. त्यामध्ये लोणंदजवळ अंदोरी रस्त्याला औद्योगिक वसाहतीला महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे.

लोणंदचा खरेदी विक्री संघ कांदा बाजारामुळे जिल्हयात प्रसिध्द आहे. लोणंदचे तेल घाणे महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत तर याच ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आहे. लोणंदला वखार महामंडळाचे धान्य गोदाम सातारा जिल्हयात दुसऱ्या क्रमांकाचे आहे. याशिवाय खंडाळयाजवळ मावशी या गावाजवळ "किसन वीर सहकारी साखर कारखान्याला" नवीन मंजुरी मिळाली आहे. लोणंदला इलेक्ट्रीक बोर्ड प्रसिध्द आहे. कारण त्याचा मोठा विस्तार आहे. सातारा जिल्हयातील 5/6 तालुक्याला विद्युत पुरवठा लोणंदवरून केला जातो. तारापूर, कोयना, वीर, भाटघर या ठिकाणाहून लोणंदला वीज येते. रेल्वे गेज लोणंदला असल्याने दळणवळणाची सोय होऊन उद्योगधंद्यांना गती मिळाली आहे. म्हणजेच कांदा खरेदीसाठी देशी–विदेशी व्यापारी येथे येतात.

लोणंदच्या औद्योगिक विकास योजनेला (एम.आय.डी.सी.) महाराष्ट्र शासनाने डी++ असा दर्जा दिलेला आहे. त्यामुळे पुढील काळात या परिसराचा विकास होण्यास मदत होईल म्हणजेच अनेक उद्योगपतींचे जाळे या परिसरात पडणार आहे यात शंका नाही. रविंद्र प्लास्टीक कारखाना,

सनला कारखाना असे अनेक लहान मोठे कारखाने लोणंदच्या परिसरात आहेत. इतिहासाचा मागोवा घेत औद्योगिक विकासाच्या दृष्टीने या तालुक्याची वाटचाल सुरू आहे. भारतीय आणि विदेशी कंपन्यांच्या सहकार्याने शिरवळ परिसरात औद्योगिक वसाहत साकार होत आहे. तर पाडेगाव येथील उस संशोधन केंद्र प्रख्यात आहे. खंडाळा येथील दुध शीतकरण प्रकल्प व एस.टी.डेपो मोलाचा आहे.

लोणंद परिसरातील लोकांचा शेतीप्रमाणेच मेंढपाळ हा प्रमुख व्यवसाय आहे. कांदा व कापूस ही नगदी पिके आहेत. लोणंद ही कांद्याची व कापसाची फार मोठी बाजारपेठ असून महाराष्ट्रातील ती दोन नंबरची मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. याचा तालुक्यातील जनतेला सार्थ अभिमान आहे.

मेंदु, मन आणि मनगट यांच्या सहयोगातून सहकाराचे तत्त्व आणि निसर्गावर मात करण्याची जिद्द या माणसाच्या हाडीमासी रूजली आहे. अनेक सहकारी संस्था गोर–गरीब जनतेला आर्थिक पाठबळ देत आहेत. तालुक्यातील जनतेचा सर्वांगिण विकास करण्याची जिद्द बाळगून सन 1992 पासून "खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठान" ची स्थापना करण्यात आली आहे. आज ती एक आशादायी उपक्रमशील संस्था म्हणून ओळखली जाते.

सहकारी तत्वावर सहकारी कारखाना उतरावा हा येथील माणसांचा संकल्प आहे. त्यादृष्टीने वाटचाल सुरू आहे. त्यासाठी तालुक्याला वरदान ठरणारे "देवघर धरण" पूर्ण व्हावे. हा त्यांचा ध्यास आहे. या तालुक्याच्या वैराण माळावर नंदनवन फुलविण्याचे स्वप्न साकार करणारा "किसन वीर सहकारी साखर कारखाना" कार्यान्वित झाला तर खंडाळा तालुक्याचा कायापालट होईल. नव्या उमेदीने शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या तरूणांच्या आकांक्षा फलद्रुप होतील, आर्थिक स्वावलंबन मिळेल अशी आशा वाटते.

लोणंद परिसराचा खऱ्या अर्थाने विकास होण्यासाठी औद्योगिक विकास संस्थेची स्थापना होऊन तो उद्योग जोरात चालणे आवश्यक आहे. त्यामुळे परिसरातील बेकारांची समस्या सुटण्यास

मदत होईल. एकंदरीत औद्योगिकदृष्टया लोणंदचा परिसर संपन्न असलेला दिसून येईल. म्हणून लोणंदची बाजारपेठ एक सुसज्ज बाजारपेठ म्हणून ओळखली जाते.

9. **धार्मिक :-**

लोणंद परिसरातील जेजुरीचा "खंडोबा" हा पुऱ्या महाराष्ट्राचे अत्यंत लोकप्रिय दैवत आहे. जनमाणसांची फार मोठया प्रमाणावर पकड घेणारा, ब्राह्मणापासून ते अस्पृशांपर्यंत, एवढेच नव्हे तर अत्यंतीक धर्माभिमानी मुसलमानांनाही प्रिय असणारा, श्रध्दा व भक्तीने पूजिला जाणारा, सर्व जमातीत कुलदैवत म्हणून स्विकारला गेलेला खंडोबा हा खऱ्या महाराष्ट्राचा "लोकदेवच" म्हटला पाहिजे.

विठ्ठल आणि खंडोबा यांच्या मूर्तीत साम्य असल्याचे दिसून येते. खंडोबा हा मूळचा कानडी देव. कर्नाटकामधील. पण महाराष्ट्रातील लोकजीवनाशी तो एकरूप होऊन गेला आहे. त्यामुळे त्याचे कानडीपण लक्षातही येत नाही. वास्तविक हा धनगरांचा देव आहे. पण ब्राह्मणापासून ते बहुजन समाजापर्यंत तो कुलदैवत म्हणून स्विकारला गेला, पूजीला गेला. त्यालाच मल्हारी मार्तंड असे म्हणतात. मल्हारी हा शिवाचा अवतार ओळखला जातो. खंडोबा हे कामीक दैवत असून भक्तांच्या नवसाला पावते अशी श्रध्दा आहे. खंडोबाला भंडारा अत्यंत प्रिय असतो. "सदानंदाचा येळकोट व येळकोट यैळकोट जयमल्हार" अशी त्याच्या नावाने भक्तगण गर्जना करतात. लोणंद परिसरात खंडोबा हे एक आराध्य जागृत दैवत म्हणून ओळखले जाते. जेजूरीला यात्रेवेळी पूर्वीपासून खेचरांचा बाजार भरतो हे सर्व परिचित आहे. त्यामुळे जेजुरी गावाला धार्मिकतेच्या बाबतीत फार महत्व आहे.

लोणंदच्या परिसरात मुख्यत्वे खंडोबा, बिरोबा, धुळोबा, मस्कोबा, रंगोबा, पीरसाहेब इ. प्रमुख देव तर कडजाई, वडजाई, मरीआई, लक्ष्मीआई, भिवाई अशा प्रमुख देवता आढळून येतात. या सर्व देवदेवतांना धनगरी लोकांची मुख्य दैवते म्हणून ओळखली जातात. त्यात खंडोबाला विशेष स्थान आहे. या परिसरात प्रत्येक गावात, माळरानावर, डोंगरावर अशा कोणत्या ना कोणत्या देवता

आढळतात. उदा. जेजुरीचा खंडोबा, साल्पेचा बिरोबा, वीर–लोणंदचा मस्कोबा, मरीआईच्या वाडीचा रंगोबा तर हरळीची कडजाई, खेडची वडजाई, मरीआईच्या वाडीची मरीआई तर लक्ष्मीआईचे मंदिर प्रत्येक गावात आढळते.

बिरोबाची यात्रा या परिसरात मोठी समजली जाते. ती यात्रा कार्तिक महिन्यातील पोर्णिमेला येते. या यात्रेचे वैशिष्टये म्हणजे या यात्रेत घोडयांचा व घोंगडयांचा बाजार मोठया प्रमाणात भरतो. यात्रेदिवशी गजनृत्य, ओव्यांचे कार्यक्रम होतात. यावेळी परिसरातील सर्व लोक येतात. या सारखी माघ महिन्यात वीरच्या मस्कोबाची मोठी यात्रा भरते. देवतांच्यामध्ये कडजाईची यात्रा कार्तिक महिन्यात शिलंगणादिवशी येते तर वडजाईदेवीची यात्रा माघ महिन्यात पौर्णिमेला भरते. या यात्रेचे खास वैशिष्टये म्हणजे या यात्रेत बैलांच्या झुंजी लावल्या जातात. मनाला शांती मिळणे, कुलदैवतांची भक्ती करणे हा हेतू असतो. या सर्व यात्रांत बकऱ्या–कोंबडयाचे बळी मोठया प्रमाणावर दिले जातात.

प्रत्येक देवाची दोन दिवस यात्रा असते. त्याला ताजी व शिळी यात्रा म्हणतात. पहिल्या दिवशी देवाला आंघोळ घालणे, जागर करणे म्हणजे देव जागविणे. त्याला छबिना काढणे असेही म्हणतात. त्यात अनेक मोठमोठे ढोल वाजवून गुलाल भंडाऱ्याची उधळण मोठया प्रमाणावर केली जाते. दुसऱ्या दिवशी देवासमोर नाचगाणे होते. एकमेकांच्या, पाहुण्यांच्या गाठीभेटी पडतात. त्यात एकमेकांची खुशाली, अडचणी, सोयरीक यांची विचारपूस होते. नंतर जेवणे झाल्यानंतर यात्रा पांगते.

अहिरे–अहिरेश्वर, काळज–मोर्वे–अंदोरी, घाटदरे या ठिकाणची दत्त मंदीरे प्रेक्षणीय आहेत. या मंदिरात अनेक शुभविवाह पार पडतात. त्यामुळे या मंदिरांना या परिसरात महत्व प्राप्त झाले आहे. याशिवाय प्रत्येक गावात या परीसरात मोठया लोकसंख्येने वार्षिक यात्रा भरतात. त्यात पशुहत्याही मोठया प्रमाणात होत असते. याशिवाय मुस्लिम, ख्रिश्चन यांची प्रार्थना, नमाज पाडणे सतत चालू असते त्यांची स्वतःची अशी भव्य वसतीगृहे आहेत. संत ज्ञानेश्वरांची पालखी दोन दिवस लोणंदला असते त्यावेळी लाखो भाविक त्यांच्या दर्शनासाठी लोणंदला येतात आणि ज्ञानेश्वर पालखीचे मनसोक्त दर्शन घेतात. या दर्शनासाठी पूर्ण सातारा जिल्हयातील लोक भाविक, वारकरी लोणंदला दर्शनासाठी येतात.

धनगरी लोक जेव्हा या परिसरातील यात्रा होतात तेव्हा दोन दिवस रात्रभर धनगरी ओव्या गात असतात. त्या ओव्यातून देवदेवताविषयी आदरभाव, त्यांचा पराक्रम, अडचणीत पडलेल्यांना मदत चालू परिस्थिती व्यक्त करीत असतात. यातून मनोरंजन व लोकशिक्षण होते. या सर्व यात्रात दुसऱ्या दिवसाला फार महत्व असते. कारण त्या दिवशी पुजाऱ्याच्या अंगात येऊन तो सर्व काही पुढील वर्षाचे पूर्ण भविष्य सांगतो. त्याला "भाकणूक" असेही म्हणतात. भाकणूक सांगणारा माणूस धनगर समाजातीलच असतो. यावेळी यात्रेकरू स्तब्ध उभे राहून ती भाकणूक बारकाईने ऐकतात. या दृष्टीने खेड, जेजुरी, सालपे व हरळी या ठिकाणच्या यात्रा महत्वाच्या मानल्या जातात. या परिसरातील आणखी एक महत्वाचा सण म्हणून बोरीचा बार ओळखला जातो.

थोडक्यात लोणंद परिसरात धनगरी समाजात धार्मिकतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येईल. धार्मिक परंपरा व रूढी जोपासून देवदेवतांच्या जीवनदर्शनातून समाजाला सदगुणांचे आदर्श घालून दिले जातात.

<u>समारोप</u> :-

लोणंद परिसरात राहणाऱ्या लोकांची वस्ती डोंगरमाथ्यावर, माळरानावर, कडेकपारीत, कानाकोपऱ्यात असलेली आढळते. या परिसरात राहणारा धनगर समाज याचाही एक इतिहासच आहे. त्या समाजाच्या अनेक समस्या सुटलेल्या असल्या तरी आर्थिक, औद्यागिक, सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणा सारख्या अनेक समस्या आजही भेडसावत असलेल्या दिसून येतात. कारण दुष्काळग्रस्त भाग, स्थानिक, राजकीय नेत्याचा अभाव, दुर्गम भाग, पाणीचारा टंचाई, अडाणी व अज्ञानी लोक, आर्थिक परिस्थिती हलाखीची यामुळे या परिसराचा विकास होण्यास खीळ बसत आहे. तरीही त्यात कालानुरूप थोडयाफार प्रमाणात बदलही होत आहे हे दिसून येते.

लोणंदचा परिसर अशाप्रकारे भौगोलिक, सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, औद्योगिक व धार्मिक या घडामोडींनी युक्त नटलेला असा परिसर आहे.

खंडाळा तालुक्याच्या सर्वच क्षेत्रातील पुरेशी माहिती देण्याचा मी येथे प्रयत्न केला आहे. येथील सर्व समाज, त्यांच्या भावन, आचार–विचार, त्यांची श्रध्दास्थाने या सर्व गोष्टींचा मी मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी सर्व समाजाच्या मानसिक, बौध्दिक, शारीरिक ताकतीवरच लोकशाहीप्रणाली घडत असते. म्हणून सर्व क्षेत्रातील माहितीचे संकलन मी येथे केले आहे. कारण या माहितीवरूनच मला लोकसाहित्याच्या संकलनाकडे वळावयाचे आहे व त्याचा रसास्वाद घ्यावयाचा आहे. त्या अगोदर लोकसाहित्याची संकल्पना समजून घेणे अगत्याचे आहे. आज जगभर लोकसाहित्याला कमालीचे महत्व आले आहे. त्यामुळे लोकसाहित्याचे तांत्रिक ज्ञान व त्याबद्दलची चिकित्सा करणे अपरिहार्य आहे. म्हणून मी दुसऱ्या प्रकरणात लोकसाहित्याचे स्वरूप व वैशिष्टये अभ्यासले आहे. व खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीतांचे स्वरूप व वैशिष्टये आजमावले आहे. यातूनच मला लोकसाहित्य व मानवी जीवन यांच्यातील बंध–अनुबंध स्पष्ट करावयाचे आहेत.

## संदर्भ


1. तालुका – गाव – जनगणना 1991 नुसार :–

   Census of India - 1991 Series - 14 Part - 12 - A and B. District Census Handbook, Satara By - J.K. BHANTHIA, Director of Census Operations Maharashtra 1996, Printed At the Government Central Press, Mumbai.

2. सुंदर सातारा, लेखक – रमेश मंत्री, प्रथमावृत्ती 26 जानेवारी 1986, अनुभव प्रकाशन – 1, मुंबई – 57, पृ.36.

3. तत्रैय.

4. तत्रैय.

5. ज्ञानगंगा गौरव विशेषांक 1992, संपादक – श्री.सुरेश बुधकर, खंडाळा विभाग विकास समिती, पृष्ठ क्र.17.

6. राजा शिवछत्रपति, पूर्वार्ध व उत्तरार्ध, लेखक – बाबासाहेब पुरंदरे, पुरंदरे प्रकाशन, 1228 सदाशिव पेठ, पुणे – 411 030, आवृत्ती – बारावी, 20 एप्रिल, 1993, पृष्ठ क्र.102.

7. तत्रैय – पृष्ठ क्र.103

8. तत्रैय – पृष्ठ क्र.251.

9. श्री मल्हारी मार्तंड, लेखक म.स.घोलप, उमा पब्लीकेशन, पुणे 30, नविन आवृत्ती, 1997, पृष्ठ क्र.62.

10. श्री खंडोबाची नवी जुनी गाणी सं – शिवदास जानबा कदम, उमा पब्लीकेशन, पुणे – 30, नविन आवृत्ती 1997, पृष्ठ क्र.13

11. श्री मल्हारी मार्तंड, लेखक – म.स.घोलप, उमा पब्लीकेशन, पुणे – 30, नविन आवृत्ती 1997, पृष्ठ क्र.60.

12. श्री मल्हारी कथासार लेखक – न.वि.बिडकर, सारथी प्रकाशन पुणे – 30, प्रसिध्द सन 1997, पृष्ठ क्र.123.

13. तत्रैय – पृष्ठ क्र.124, 125.

14. श्री खंडोबाच्या गोष्टी, श्रीकांत गावडे, अनमोल प्रकाशन – 2, नविन आवृत्ती – जानेवारी 1997, पृष्ठ क्र.29.

15. श्री मल्हारी मार्तंड, लेखक श्री म.स.घोलप, उमा पब्लिकेशन, पुणे 31, नविन आवृत्ती 1997, पृष्ठ क्र.72.

16. श्री मल्हारी कथासार, लेखक – न.वि.बिडकर, सारथी प्रकाशन, पुणे – 30, पृष्ठ क्र.9.

17. तत्रैय.